# महाराष्ट्र विधानपरिषद

## पहिले अधिवेशन, २०२३

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**मंगळवार, दिनांक १४ मार्च, २०२३ / फाल्गुन २३, १९४४ (शके)**

| | | |
|---|---|---|
| (१) | ग्रामविकास व पंचायत राज, वैद्यकीय शिक्षण, क्रीडा व युवक कल्याण मंत्री | यांचे प्रभारी विभाग |
| (२) | पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री | |
| (३) | कामगार मंत्री | |
| (४) | सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री | |
| (५) | पर्यटन, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता, महिला व बालविकास मंत्री | |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ३७**

---

### राज्यातील प्राविण्यप्राप्त मल्लखांब खेळाडूंना शासकीय सेवेत थेट नियुक्ती देण्याबाबत

**(१) * १७२५९ श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.रमेशदादा पाटील, श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे : तारांकित प्रश्न क्रमांक १५२०० ला दिनांक २६ डिसेंबर, २०२२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **क्रीडा व युवक कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासकीय नोकरीतील भरतीसाठी राज्यातील खेळाडूंना ५ टक्के आरक्षण देण्याबाबतचा निर्णय शासनाने दिनांक १५ नोव्हेंबर, २०१७ रोजी निर्गमित केला असून सदर आरक्षणात मल्लखांब या खेळाचा समावेश करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासकीय नोकरीतील रिक्त जागा भरण्यासाठी शासनाने कालबध्द कार्यक्रम जाहीर केला आहे काय, त्याद्वारे खेळाडूंकरिता असलेल्या ५ टक्के जागा भरण्यासंदर्भात सामान्य प्रशासन विभागाच्या अपर मुख्य सचिव, सेवा यांच्या अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आलेल्या समितीच्या शिफारशींचे स्वरुप व सद्य:स्थिती काय आहे,

(३) असल्यास, मल्लखांब खेळाचा समावेश शासनाच्या थेट नियुक्तीसाठी केलेल्या वरिष्ठ अधिकृत आंतराष्ट्रीय क्रीडा स्पर्धांमध्ये अद्यापही केला नसल्याची बाब दिनांक १३ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, क्रीडा क्षेत्राला प्रोत्साहन आणि नवीन खेळाडू तयार होण्यास मदत होण्यासाठी मल्लखांब खेळाचा समावेश शासनसेवेत थेट नियुक्ती करिताच्या खेळांच्या यादीमध्ये करण्याबाबत शासनाने कोणता धोरणात्मक निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,

(५) असल्यास, मल्लखांब खेळाच्या मुंबई येथे आयोजित केलेल्या पहिल्या विश्व अजिंक्यपद स्पर्धेमध्ये (world cup २०१९) भारताचा संघ विजयी ठरला असून या संघामध्ये महाराष्ट्रातील खेळाडूंचा मोठ्या प्रमाणात सहभाग असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने मल्लखांब या देशी खेळप्रकारातील प्राविण्यप्राप्त खेळाडूंना प्रोत्साहन मिळावे याकरिता “मल्लखांब” खेळाडूंचा शासकीय सेवेतील ५ टक्के आरक्षणामध्ये समावेश करुन खेळाचा प्रचार, प्रसार विस्तार करुन खेळाकरिता जागा उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन :** (१) होय, हे खरे आहे.
(२), (३), (४), (५) व (६) अपर मुख्य सचिव (सेवा), सा.प्र.वि. यांच्या अध्यक्षतेखाली गठीत समितीची कार्यकक्षा ही शासन सेवेत खेळाडूंची थेट नियुक्ती व त्यासंदर्भातील इतर सेवा शर्तींशी निगडीत आहे. या संदर्भात सदर समितीने सादर केलेल्या शिफ़ारशी शासनाच्या विचाराधीन आहेत. वरिष्ठ अधिकृत आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धांमध्ये संबंधित खेळाचा समावेश करणे ही बाब शासनाच्या अखत्यारीत नाही. मुंबई येथे आयोजित पहिल्या विश्व मल्लखांब अजिंक्यपद स्पर्धेमध्ये महाराष्ट्रातील खेळाडूंनी प्राविण्य मिळविले आहे. तथापि, सदर खेळाचा समावेश अधिकृत आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये नाही. शासनाच्या दिनांक १५/११/२०१७ च्या शासन निर्णयानुसार “मल्लखांब” या खेळाचा समावेश ५ टक्के आरक्षणासाठी करण्यात आला आहे. तथापि, सदर खेळाचा प्रचार व प्रसार करुन सदर खेळास जागा उपलब्ध करुन देण्याची बाब तपासण्यात येत आहे.

-----------------

## परभणी जिल्हा रुग्णालयातील तत्कालीन शल्यचिकित्सक यांनी वित्तीय अनियमितता केल्याबाबत

**(२) * १७१८९ श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.अमोल मिटकरी : तारांकित प्रश्न क्रमांक १६२७५ ला दिनांक २६ डिसेंबर, २०२२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) परभणी जिल्हा रुग्णालयातील तत्कालीन जिल्हा शल्यचिकित्सक यांनी कोरोना काळात आपल्या अधिकाराचा व पदाचा गैरवापर करीत वित्तीय अनिययमितता केली तसेच काही संस्थांच्या मदतीने गैरप्रकार केल्याची तक्रार परभणी येथील सामाजिक कार्यकर्त्यांनी माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान जिल्हाधिकारी, परभणी यांच्याकडे लेखी निवेदनाव्दारे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जिल्हा शल्यचिकित्सक व इतरांनी केलेल्या खरेदी अनियमितता प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय, सदर संस्थांची थोडक्यात माहिती काय आहे,
(३) असल्यास, उपसंचालक, आरोग्य सेवा, छत्रपती सभाजीनगर यांचे स्तरावर समिती गठीत करून सदर प्रकरणाची चौकशी करून अहवाल सादर करण्याबाबतच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे आणि तद्नुषंगाने तत्कालीन जिल्हा शल्यचिकित्सक, परभणी तसेच संबंधित दोषी संस्थांवर कारवाई करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) परभणी जिल्हा रुग्णालयातील तत्कालीन जिल्हा शल्यचिकित्सक यांनी कोरोना काळात वित्तीय अनियमितता केली आहे किंवा कसे याबाबत जिल्हाधिकारी,परभणी यांच्या सूचनेनुसार प्रस्तुत खरेदीचे लेखापरीक्षण करण्यात आले आहे.
(२), (३) व (४) जिल्हाधिकारी, परभणी यांचे आदेशानुसार जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अंतर्गत प्राप्त निधीच्या विनियोजनाबाबतची तपासणी करण्यात आलेली आहे. उपस्थित केलेल्या आक्षेपांचा अहवाल जिल्हाधिकारी,परभणी यांचेकडून आयुक्त, आरोग्य सेवा आयुक्तालय, मुंबई यांच्या कार्यालयास दिनांक २४/०२/२०२३ रोजी प्राप्त झालेला आहे. सदर अहवालातील मुद्यांच्या अनुषंगाने प्रस्तुत प्रकरणी उपसंचालक यांच्या स्तरावर चौकशी समिती स्थापन करुन चौकशी अहवाल सादर करण्याबाबतच्या सुचना सहसंचालक, आरोग्य सेवा (खरेदी कक्ष), मुंबई यांनी त्यांच्या दिनांक ०२/०३/२०२३ रोजीच्या पत्रान्वये दिलेल्या आहेत.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## रायगड जिल्ह्यातील अनेक गावे पाणीपुरवठ्याच्या योजनांपासून वंचित असल्याबाबत

**(३) * १६९७६ श्री.जयंत पाटील, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.जयंत आसगावकर, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, डॉ.वजाहत मिर्झा, डॉ.प्रज्ञा सातव :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात विशेषत: रायगड जिल्ह्यात अद्यापही पाणीटंचाईच्या समस्या निर्माण होत असून सदर समस्येचे निराकरण शासनामार्फत झाले नसल्याची बाब माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जलजीवन मिशन योजनेंतर्गत रायगड जिल्ह्यात कोट्यवधी रुपयांच्या कामाचे वाटप होऊन निधीही वितरीत करण्यात आला असून, जलसाठ्याचे प्रमाण वाढविण्याच्या दृष्टीने सदर योजना फलदायी ठरत नसून अनेक भागात पाणीटंचाई समस्येचा नागरिकांना सामना करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग अंतर्गत राज्यात जलजीवन मिशन योजना राबविण्यात येत असून या योजनेचा लाभ घेण्यासाठी ग्रामपंचायतीचे १० टक्के सामुदायिक योगदान (लोक वर्गणी) गोळा करणे अनिवार्य असून या अटीमुळे अनेक गावांना १० टक्के लोकवर्गणी जमा करणे शक्य नसल्याने ही गावे जलजीवन मिशन योजनेपासून वंचित राहणार आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्यात गेली अनेक वर्षे विविध पाणीपुरवठा योजनांवर कोट्यवधी रुपये खर्च करण्यात आले असूनही आजही रायगड जिल्ह्यासह अनेक गावे पाणीपुरवठ्याच्या अनेक योजनांपासून वंचित असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, निधीची तरतूद करुनही जिल्ह्यात पाणी पुरवठ्याचा अभाव, पाणी टंचाई समस्यांचे निराकरण होत नसल्यामुळे जल योजनेसाठी प्राप्त निधीचा विनीयोग कशा प्रकारे केला जातो याबाबत नागरिकांच्या मनात संभ्रम निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, ग्रामपंचायतीचे १० टक्के सामुदायिक योगदान (लोक वर्गणी) गोळा करणे ही अट रद्द करण्याच्या दृष्टीने तसेच पाणीपुरवठा योजनेत वारंवार संबंधित अधिकाऱ्यांकडून मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार होऊन संबंधित जिल्ह्यातील आयुक्तांनी चौकशीचे आदेश दिले असून, चौकशीअंती दोषी आढळणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गुलाबराव पाटील :** (१) हे खरे नाही.
(२) हे अंशत: खरे आहे.
(३) जल जीवन मिशनच्या केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार योजनेच्या पायाभुत सुविधांच्या भांडवली किंमतीच्या १० टक्के एवढी लोकवर्गणी तर डोंगराळ / वन भागामध्ये व अनुसुचित जाती/जमाती लोकसंख्या असलेल्या क्षेत्रासाठी किमान ५ टक्के लोकवर्गणी गोळा होणे अनिवार्य आहे. या लोकवर्गणीची रक्कम रोख किंवा श्रमदानाच्या किंवा इतर वस्तु साहित्य स्वरुपात अदा करण्याची ग्रामस्थ/ग्रामपंचायत यांना मुभा आहे.

लोकवर्गणी अभावी गाव/गावे जल जीवन मिशन योजनेपासून वंचित असल्याची बाब निदर्शनास आलेली नाही.
(४) राज्यातील अनेक जिल्ह्याची भूरचना अग्निजन्य खडकाची असल्याने पाणी धारणा क्षमता ही अत्यंत कमी आहे. तसेच डोंगराळ भागातील गावांमध्ये, पाणी साठा कमी असलेल्या भागांमध्ये उन्हाळयामध्ये उद्भवाचे पाणी कमी झाल्यावर ठराविक वेळी पाणी टंचाई निर्माण होते.पाणी टंचाई निवारणार्थ कार्यक्रमांतर्गत विविध उपाययोजनांद्वारे गावे/वाड्यांना पाणीपुरवठा केला जातो.

राज्यात जल जीवन मिशन राबविण्यात येत असून जल जीवन मिशन अंतर्गत राज्यातील सर्व ग्रामीण कुटुंबांना सन २०२४ पर्यंत वैयक्तिक नळ जोडणीद्वारे शुध्द व शाश्वत पेयजल उपलब्ध करुन देण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे. त्यानुसार जल जीवन मिशन अंतर्गत राज्यात मोठ्या प्रमाणात कामे हाती घेण्यात आले आहेत.
(५) हे खरे नाही.
(६) जल जीवन मिशन अंतर्गत ग्रामस्थांवर लोकवर्गणीचा मोठा आर्थिक भार येत असल्याने गावांतर्गत कामांमधील ठराविक कामांवरील रकमेच्या ५/१० टक्के लोकवर्गणी आकारण्याबाबत केंद्र शासनाकडे प्रस्ताव सादर करण्यात आला होता.याबाबत केंद्र शासनाने स्वतंत्र पाणीपुरवठा योजनांबाबत योजनेच्या पूर्ण भांडवली रकमेवर तर प्रादेशिक पाणीपुरवठा योजनांबाबत गावांतर्गत कामांवर लोकवर्गणी अदा करणेबाबत दिनांक २३/१२/२०२२ रोजीच्या पत्रान्वये निर्देश दिले आहेत.

तथापि, पाणीपुरवठा योजनेतील गैरव्यवहाराबाबत रायगड जिल्ह्यातील आयुक्तांनी चौकशीचे आदेश दिल्याची बाब आढळून आलेली नाही.

-----------------

## राज्यातील निवासी डॉक्टरांच्या विविध प्रलंबित मागण्यांबाबत

**(४) * १७५५७ ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.रमेशदादा पाटील, श्री.निलय नाईक, श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, श्री.जयंत आसगावकर, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.सचिन अहिर, श्रीमती उमा खापरे, श्री.प्रवीण दटके, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्री.रामदास आंबटकर, श्री.महादेव जानकर :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ‘‘ मार्ड’’ या निवासी डॉक्टरांच्या संघटनेने वरिष्ठ निवासी डॉक्टरांची १४३२ जागांची पदनिर्मिती करणे, सहयोगी व सहायक प्राध्यापकांची रिक्त पदे तातडीने भरणे, डॉक्टरांच्या वेतनातील तफावत दूर करणे, निवासी डॉक्टरांना समान वेतन लागू करणे इ. विविध मागण्यांसाठी माहे डिसेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान पिंपरी (जि.पुणे) येथील वायसीएम रुग्णालय येथे आंदोलन केले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गत काही वर्षात राज्यातील वैद्यकीय महाविद्यालयांत पदवी आणि पदव्युत्तर जागा मोठ्या प्रमाणात वाढलेल्या असतानाही त्या तुलनेत वसतिगृहांची संख्या मात्र वाढली नसल्याचे दिनांक ३ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील शासकीय व्यवस्थेच्या माध्यमातून दरवर्षी ७१०० विद्यार्थी पदव्युत्तर वैद्यकीय शिक्षण घेत असून त्यांच्या निवासाची सोय होत नसल्याने एका खोलीत पाच ते सहा विद्यार्थ्यांना राहावे लागत असल्याची बाब माहे जानेवारी, २०२३ च्या पहिल्या आठवड्यात व त्यादरम्यान निदर्शनास आली असून राज्यात डॉक्टरांच्या निवासासाठी १०००० खोल्यांची कमतरता आहे, हेही खरे आहे काय,

(४) असल्यास, पुरेशा वसतिगृहाच्या अभावी राज्यातील वैद्यकीय महाविद्यालयांत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या निवासाचा प्रश्न सद्य:स्थितीत निर्माण झाला असून निवासासह इतर अनेक समस्यांचे निराकरण करण्याच्या दृष्टीने शासनाने कृती आराखडा तयार केला आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने राज्यातील वैद्यकीय महाविद्यालयांत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या वास्तव्याचा प्रश्न सोडविण्यासाठी वसतिगृहांची संख्या वाढविण्याबाबत तसेच निवासी डॉक्टरांच्या इतर अनेक मागण्या पूर्ण करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) हे खरे नाही.

(४) व (५) शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील वाढीव विद्यार्थी संख्येच्या प्रमाणात वसतिगृहांच्या बांधकामासंदर्भात कार्यवाही करण्यात येत आहे.

-----------------

## मराठवाड्यातील विशेषत: गंगापूर तालुक्यातील (जि.औरंगाबाद) वैयक्तिक स्वच्छतागृहाच्या अनुदान वाटपात आर्थिक गैरव्यवहार झाल्याबाबत

**(५) * १७११५ श्री.सतिश चव्हाण, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील गंगापूर (जि.औरंगाबाद) तालुक्यातील स्वच्छ भारत अभियान ग्रामीण फेज-२ अंतर्गत वैयक्तिक स्वच्छतागृहासाठी १८०० लाभार्थ्यांनी अर्ज सादर केले होते त्यापैकी ११४९ अर्जदारांनी केलेल्या अर्जास वैयक्तिक स्वच्छतागृहाचे बांधकाम करण्यासाठी मान्यता मिळाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मराठवाड्यात स्वच्छ भारत मिशन अंतर्गत ग्रामीण भागात वैयक्तिक स्वच्छतागृहाची बांधकामे मोठ्या प्रमाणावर झाली असून शासनाकडून मिळणारे रुपये १२,०००/- एवढ्या अनुदानासाठी अर्ज केले परंतु त्यांना अद्याप अनुदान मिळाले नसून, अनुदानाचा प्रस्ताव जिल्हास्तरावर सादर केला जात असून सदर अनुदानाचा निधी शासनाकडून जिल्हास्तरावर प्राप्त झाल्यावर जिल्हापरिषदेमार्फत वितरीत केला जातो हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मराठवाड्यातील तसेच गंगापूर (जि.औरंगाबाद) येथील ग्रामस्थांनी स्वत:चे पैसे खर्चून वैयक्तिक शौचालयाचे बांधकाम केले ग्रामीण भागातील गोरगरीब जनतेने वैयक्तिक स्वच्छतागृह बांधकामासाठी स्वतः खर्च केल्याने ते आर्थिक अडचणीत आले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मराठवाड्यातील १५,००० लाभधारकांचे वैयक्तिक स्वच्छतागृहाचे रुपये १८ कोटी अद्याप लाभार्थ्यांना मिळाले नसून लाभार्थ्यांच्या बँक खात्यात अनुदानाची रक्कम अदा न करता संबंधित अधिकाऱ्यांनी संगनमताने गैरव्यवहार करुन लाभार्थ्यांचे पैसे परस्पर काढून अपहार केला आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, लाभार्थ्यांना ऑनलाईन अनुदान वर्ग झाल्याची नोंद विभागाकडे आहे, परंतु लाभार्थ्यांना अद्याप अनुदान मिळाले नसून रुपये २ कोटी इतक्या रकमेचा अपहार झाला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने लाभार्थ्यांना तात्काळ अनुदानाची रक्कम अदा करुन व संबंधित दोषींवर कारवाई होण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गुलाबराव पाटील :** (१) हे अंशत: खरे आहे.

स्वच्छ भारत अभियान (ग्रा) टप्पा-II अंतर्गत, पंचायत समिती गंगापूर, जिल्हा औरंगाबाद मधील १३४६ लाभार्थ्यांनी वैयक्तिक शौचालयासाठी अर्ज केले होते. त्यापैकी ११४९ अर्जदारांनी वैयक्तिक शौचालयाचे बांधकाम पूर्ण केले आहे. या ११४९ लाभार्थ्यांचे Geo tagging झाल्यानंतर SBM-IMIS वर (ऑनलाईन) भौतिक तसेच आर्थिक नोंदी केल्या आहेत.

(२) हे अंशत: खरे आहे.

स्वच्छ भारत अभियान (ग्रा) टप्पा-II अंतर्गत, मराठवाड्यातील ८ जिल्ह्यांमध्ये, वैयक्तिक शौचालय बांधकाम केलेल्या, प्रोत्साहन अनुदान वाटप केलेल्या व प्रोत्साहन अनुदान वाटप करणे बाकी असणाऱ्या लाभार्थ्यांचा जिल्हानिहाय तपशिल खालीलप्रमाणे आहे :-

| जिल्हा | वैयक्तिक शौचालय बांधकाम संख्या | अनुदान वितरण लाभार्थी संख्या | शिल्लक लाभार्थी संख्या |
|---|---|---|---|
| औरंगाबाद | ९६१६ | ६३३३ | ३२८३ |
| जालना | १७८६४ | ८५१६ | ९३४८ |
| उस्मानाबाद | १२९६९ | ११८४७ | ११२२ |
| बीड | ४५०३ | २०९१ | २४१२ |
| नांदेड | २३९० | १९४९ | ४४१ |
| लातूर | ९२६३ | ८९८९ | २७४ |
| परभणी | ४३८६ | ३६१० | ७७६ |
| हिंगोली | ५७४४ | ४२९१ | १४५३ |
| एकूण | ६६७३५ | ४७६२६ | १९१०९ |

स्वच्छ भारत अभियान (ग्रा) टप्पा-II अंतर्गत, शासन स्तरावरून, राज्य पाणी व स्वच्छता मिशन, बेलापूर यांच्याकडे निधी जमा करण्यात येतो. सदरचा निधी, जिल्हा परिषद कार्यालयांच्या मागणीनुसार जिल्ह्यांना वितरीत करण्यात येतो.

संबंधित ग्रामसेवक/ग्रामपंचायत यांचे मार्फत वैयक्तिक शौचालय बांधकाम पूर्ण झाल्याबाबतचा प्रस्ताव पंचायत समितीकडे सादर करण्यात येतो. त्यानंतर पंचायत समिती स्तरावरून, संबंधित लाभार्थ्याचे शौचालय बांधकामाबाबत मोका पाहणी करून Geo-tagging करून SBM-IMIS प्रणालीवर लाभार्थ्यांची भौतिक नोंद करण्यात येते. त्यानंतर एकूण भौतिक नोंदीनुसार पंचायत समिती स्तरावरून जिल्ह्याकडे निधी मागणी करण्यात येते. जिल्हा स्तरावरुन, प्राप्त होणाऱ्या निधीमधून, पंचायत समिती स्तरावरून PFMS प्रणालीव्दारे लाभार्थ्यांच्या बँक खात्यामध्ये प्रोत्साहन अनुदानाची रक्कम जमा करण्यात येते व त्याची आर्थिक नोंद SBM- IMIS प्रणालीवर करण्यात येते.

(३), (४), (५) व (६) स्वच्छ भारत अभियान (ग्रा) टप्पा-II अंतर्गत, मराठवाड्यातील ८ जिल्ह्यांमध्ये, वैयक्तिक शौचालय बांधकाम केलेल्या एकूण ६६,७३५ लाभार्थ्यांपैकी ४७,६२६ लाभार्थ्यांना प्रोत्साहन अनुदानाचे वितरण करण्यात आलेले असून, त्याची आर्थिक नोंद SBM-IMIS प्रणालीवर घेण्यात आली आहे. उर्वरीत १९,१०९ लाभार्थ्यांना प्रोत्साहन अनुदान देण्याची कार्यवाही सुरू आहे. या लाभार्थ्यांना प्रोत्साहन अनुदान देण्यात आल्यानंतर त्याची आर्थिक नोंद SBM-IMIS प्रणालीवर करण्यात येईल.

तथापि, औरंगाबाद जिल्ह्यातील गंगापूर पंचायत समितीमधील १३४६ लाभार्थ्यांपैकी, ११४९ लाभार्थ्यांचे Geo tagging झाल्यानंतर SBM- IMIS वर (ऑनलाईन) भौतिक तसेच आर्थिक नोंदी केल्या आहेत. ११४९ लाभार्थ्यांपैकी ९० लाभार्थ्यांना प्रोत्साहन अनुदान अदा करण्यात आलेले असून, उर्वरित १०५९ लाभार्थ्यांना प्रोत्साहन अनुदान वितरीत करणे बाकी आहे.

गंगापूर पंचायत समिती मधील, उपरोक्त बाबींची तपासणी करण्यासाठी, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांनी ५ सदस्यीय चौकशी समिती गठीत केली आहे. या समितीने, पंचायत समिती, गंगापूरची तपासणी केली असता, ११४९ लाभार्थ्यांचे भौतिक व आर्थिक नोंदी SBM-IMIS वर करणे, तथापि, त्यापैकी केवळ ९० लाभार्थ्यांना प्रोत्साहन अनुदान अदा करण्यात आले आहे. यामध्ये प्रोत्साहन अनुदानाचा गैरव्यवहार, अपहार झाल्याचे दिसून येत नसल्याचा अहवाल समितीने सादर केला आहे. याप्रकरणी जिल्हा परिषद, औरंगाबाद यांचेस्तरावरून संबंधितांचा खुलासा मागविण्यात येत आहे.

-----------------

## हाफकीनच्या कार्यप्रणालीमुळे शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांशी संलग्न रुग्णालयांमध्ये औषध आणि साधनसामग्रीचा तुटवडा होत असल्याबाबत

**(६) * १७०२३ डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.अरुण लाड, श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस, श्री.प्रवीण दटके, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हाफकीनच्या कार्यप्रणालीमुळे राज्य शासनाच्या अखत्यारीतील बहुतांश वैद्यकीय महाविद्यालयांशी संलग्न रुग्णालयांत कोट्यवधी रुपयांचा निधी उपलब्ध असतानाही मोठ्या प्रमाणात औषधे आणि साधनसामुग्रीचा तुटवडा जाणवत असल्याची बाब माहे डिसेंबर, २०२२ च्या अंतिम सप्ताहात वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील सर्व शासकीय रुग्णालय व वैद्यकीय महाविद्यालयांसाठी आवश्यक असणाऱ्या औषधांची खरेदी हाफकीन मार्फत करण्यात येत असून, खरेदी करण्यात येणारी औषधे, गोळया व इंजेक्शने यांची तपासणी न करताच राज्यातील सर्व शासकीय रुग्णालयांना निकृष्ट दर्जाच्या औषधांचा पुरवठा करण्यात येत असून हाफकीन सर्वसामान्यांच्या जीवाशी खेळत असल्याची बाब माहे डिसेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वैद्यकीय रुग्णालय, नागपूर येथे सातत्याने इंजेक्शन व औषधांचा तुटवडा होत असल्याची बाब निदर्शनास आली असून शासकीय रुग्णालयांत औषधांचा तुटवडा जाणवत असल्याने रुग्णांच्या नातेवाईकांना खाजगी मेडिकल दुकानांतून स्वखर्चाने औषधे विकत घ्यावी लागत असल्याने आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, वस्तू व सेवा पुरवठा लेखाशीर्ष २९ मधील प्राप्त निधीतून ९० % निधी हाफकीनला वर्ग करावे लागत असल्याने फक्त १०% निधीतून औषधे खरेदी करण्याची परवानगी वैद्यकीय रुग्णालयाला आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, १७ जीवरक्षक इंजेक्शनसह औषधांचा तुटवडा झाला असून शासनाने तात्काळ कार्यप्रणालीत सुधारणा करणेकामी लोकप्रतिनिधींनी लेखी निवेदने सादर केली असून गत पाच वर्षांत रुपये ४७० कोटींपेक्षा अधिक निधी यंत्रसामग्री आणि औषधे खरेदी न केल्यामुळे परत जाण्याची शक्यता निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, हाफकीन मार्फत खरेदी करण्यात आलेले निकृष्ट ओरोफर इंजेक्शन दिल्यामुळे शहरातील नामवंत रुग्णालयात रुग्णाचा मृत्यू झाला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(७) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले आहे आणि राज्य शासनाच्या अखत्यारीतील बहुतांश वैद्यकीय महाविद्यालयांशी संलग्न रुग्णालयांतील औषधे आणि साधनसामुग्रीचा तुटवडा दूर करण्याबाबत तसेच हाफकीन मार्फत खरेदी करण्यात येणारी औषधे, गोळया व इंजेक्शन यांच्या दर्जाची नियमित वैद्यकीय प्रयोगशाळेत तपासणी करुन राज्यातील सर्व शासकीय रुग्णालय व वैद्यकीय महाविद्यालयांना पुरविण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही अथवा उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन :** (१) सार्वजनिक आरोग्य विभागाच्या दिनांक २६/०७/२०१७ रोजीच्या शासन निर्णयातील तरतूदीनुसार शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयांना आवश्यक असणारी औषधे व अन्य तद्नुषंगिक बाबींची खरेदी हाफकीन महामंडळामार्फत करुन संस्थांना पुरवठा करण्यात येतो,

तथापि, उक्त बाबींचा पुरवठा होण्याकरिता विलंब झाल्यास अत्यावश्यक औषधे व अन्य बाबींची खरेदी महात्मा फुले जन आरोग्य योजना निधी, सीएसआर निधी, स्विय प्रपंजी खात्यातील निधी तसेच जिल्हा वार्षिक निधीमधून संस्थास्तरावर दरपत्रकाच्या आधारे करुन रुग्णसेवा सुरळीत ठेवण्यात येते.

(२) नाही.

(३) नाही.

(४) सार्वजनिक आरोग्य विभागाच्या दिनांक २६/०७/२०१७ रोजीच्या शासन निर्णयातील तरतूदीनुसार स्थानिक खरेदीसाठी निश्चित करण्यात आलेली १० टक्के मर्यादा विभागाच्या दिनांक २६/१२/२०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये ३० टक्केपर्यंत वाढविण्यात आली आहे.

(५) हाफाकीन महामंडळ, मुंबई यांनी दिनांक ०१/०१/२०२२ ते ३१/१२/२०२२ या कालावधीत संचालनालयाच्या अधिनस्त संस्थांसाठी आवश्यक इंजेक्शन या बाबींचे एकूण १२० खरेदी पुरवठा आदेश निर्गमित केलेले आहेत. त्यामुळे जीवरक्षक इंजेक्शन व औषधांचा तुटवडा झालेला नाही.

तथापि, औषधे, यंत्रे व उपकरणे यांची खरेदी हाफकीन महामंडळामार्फत करण्यासाठी राबविण्यात आलेल्या निविदा प्रक्रियेमध्ये निविदेस अल्प प्रतिसाद, प्रशासकीय मान्यतेच्या कालावधीत प्रक्रिया पूर्ण न होणे. तसेच विविध कारणांमुळे पुनर्निविदा प्रसिध्द करावी लागणे यास्तव शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयांनी वर्ग केलेल्या निधीपैकी अखर्चित निधी हाफकीन महामंडळाकडे शिल्लक आहे.

(६) शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयांकरिता ओरोफर इंजेक्शनची खरेदी हाफकीन महामंडळामार्फत करण्यात आलेली नाही.

(७) आरोग्य संस्थांना औषधे व अन्य बाबींचा पुरवठा होण्यास विलंब होऊन रुग्णसेवा विस्कळीत होऊ नये यास्तव सार्वजनिक आरोग्य विभागाने औषधे, सर्जिकल्स साहित्य व अन्य बाबींची खरेदी करण्यासाठी “महाराष्ट्र वैद्यकीय खरेदी प्राधिकरण” निर्माण करण्याचा धोरणात्मक निर्णय घेतला आहे. तसेच हाफकीन महामंडळाच्या खरेदी कक्षामार्फत सध्य:स्थितीत करण्यात येणाऱ्या औषधे व अन्य बाबींच्या खरेदीसंदर्भात मानक कार्यपध्दती (SOP) शासनामार्फत निश्चित करण्यात आली आहे.

-----------------

## मुंढेगाव (ता.इगतपुरी, जि.नाशिक) येथील जिंदाल पॉलीफिल्म प्रा. लि. या कंपनीतील पॉलीफायर प्लांटला आग लागून झालेल्या स्फोटाबाबत

**(७) * १७७४३ श्री.अंबादास दानवे, श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, श्री.जयंत आसगावकर, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.सचिन अहिर, श्री.प्रसाद लाड, श्री.शशिकांत शिंदे, श्री.अमोल मिटकरी, श्री.सतिश चव्हाण, श्री.अनिकेत तटकरे, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंढेगाव (ता.इगतपुरी, जि.नाशिक) शिवारातील जिंदाल पॉलीफिल्म प्रा. लि. या कंपनीच्या पॉलीफायर प्लांटला दिनांक १ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास आग लागून झालेल्या बॉयलर स्फोटामुळे २ महिला कामगारांचा मृत्यू, २० कामगार जखमी व ८३ कामगार बेपत्ता झाले असून काही कर्मचारी कंपनीमध्ये अडकून पडल्याची दुर्घटना घडली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, केमिकल स्टोरेजमधून गळती होऊन रिॲक्टरचा स्फोट झाल्यामुळे उक्त घटना घडल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर दुर्घटना स्थळास मा.मुख्यमंत्री महोदयांनी भेट देऊन पाहणी केल्यानंतर त्याबाबतची उच्चस्तरीय चौकशी करण्याचे आदेश देऊन त्याचवेळी मृतांच्या वारसास पाच लाख रुपये आर्थिक मदत देण्याचे मा.मुख्यमंत्री महोदयांनी घोषित केले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शासनाने आदेशित केल्यानुसार, सदर आगीची उच्चस्तरीय चौकशी करण्यात येऊन त्याबाबतचा अहवाल शासनास प्राप्त झाला आहे काय व सदर अहवालात काय नमूद करण्यात आले आहे व त्याप्रकरणी पुढे कोणती कारवाई करण्यात आली अथवा येत आहे,
(५) असल्यास, सदर कंपनीस कामगार आयुक्तांच्या पथकाने दर महिन्यास भेट देऊन पाहणी करणे बंधनकारक असताना कामगार आयुक्त पथकाने सदर कंपनीस केव्हा भेट दिली होती व त्या पाहणीमध्ये काय आढळून आले,
(६) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तदनुषंगाने संबंधित घटनेस दोषी असलेल्यांवर कारवाई करुन मृत कामगारांच्या वारसांना प्रत्येकी ५ लाख रुपयांची मदत देण्याबाबत तसेच जखमी झालेल्या कामगारांना आर्थिक मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. सुरेश (भाऊ) खाडे :** (१) जेपीएफएल फिल्म्स प्रा.लि.मुंढेगाव, ता.इगतपुरी जि.नाशिक (पुर्वीचे नाव-जिंदाल पॉलीफिल्म्स प्रा.लि.) या कारखान्यात दिनांक ०१/०१/२०२३ रोजी कारखान्याच्या बॅच पॉली प्लांन्टच्या तळमजल्यावर गरम थर्मिक फ्ल्युइड ऑईलची गळती होऊन, तिथे जमा झालेल्या ऑईलच्या वाफेचा (Vapour Cloud) स्फोट झाला, व नंतर त्यामुळे आग लागली. त्यामुळे सदर कारखान्यातील दुर्घटना ही बॉयलरचा स्फोट होऊन घडलेली नाही.

घटनेच्या दिवशी कारखाना परिसरात ७७७ कामगार काम करीत होते.त्यापैकी ३ कामगारांचा (दोन महिला व एक पुरूष) मृत्यू झाला असून २२ कामगार जखमी झाले. याशिवाय कोणताही कामगार/व्यक्ती बेपत्ता नाही.
(२) हे खरे नाही.
(३) व (४) सदर दुर्घटनेच्या ठिकाणी मा.मुख्यमंत्री महोदयांनी भेट देऊन पाहणी केली होती.

सदर दुर्घटनेची सविस्तर चौकशी करण्यासाठी जिल्हाधिकारी, नाशिक यांनी अपर जिल्हाधिकारी, नाशिक यांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय चौकशी समिती गठित केलेली आहे. समितीने अहवाल सादर केला असून, अहवालात अपघाताची सविस्तर चौकशी करून भविष्यात सदर घटनेची पुनरावृत्ती होऊ नये याकरिता शिफारशी सुचविल्या आहेत.

तसेच मृत कामगारांच्या वारसास मुख्यमंत्री सहायता निधीतून प्रत्येकी रूपये पाच लक्ष इतकी आर्थिक मदत देण्यात आलेली आहे.

(५) "इज ऑफ डुईंग बिझनेस" मध्ये केंद्रीय निरीक्षण प्रणालीद्वारे (Central Inspection System) निरीक्षण करण्याकरिता आस्थापनांची माहिती ऑनलाईन संगणकीय प्रणालीवर येते. सदर आस्थापनांचे निरीक्षण करून निरीक्षण शेरे प्रविष्ट (अपलोड) केली जातात.

तसेच कामगार आयुक्त यांच्या क्षेत्रिय कार्यालयामार्फत सदर कंपनीस दिनांक १४/११/२०२१ रोजी भेट देण्यात आली असून, विविध कामगार कायद्यांतर्गत तपासणी करण्यात आली आहे. आढळून आलेल्या त्रुटींची पूर्तता न झाल्याने संबंधित आस्थापना व कंत्राटदारांविरूध्द मा.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, इगतपुरी जि.नाशिक यांचे न्यायालयात खटले दाखल करण्यात आले आहेत.

(६) सदर घटनेची औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालयाकडून चौकशी करण्यात आली आहे.

चौकशीदरम्यान आढळून आलेल्या नियम भंगाबाबत कारखान्याच्या भोगवटादाराविरूध्द मा.मुख्य न्यायदंडाधिकारी, नाशिक यांचे न्यायालयात खटला दाखल करण्यात आला आहे.

दुर्घटनेतील ३ मृत कामगारांपैकी एका कामगाराच्या वारसांस नुकसान भरपाई देण्यासाठी कारखाना व्यवस्थापनाने आयुक्त, नुकसान भरपाई, नाशिक यांचेकडे रुपये १५,७४,४००/- इतकी रक्कम जमा केली असून, उर्वरीत दोन मृत कामगार हे राज्य कामगार विमा मंडळाचे सदस्य असल्याने, त्यांच्या वारसास नुकसान भरपाई देण्यासाठी सदर प्रकरण राज्य कामगार विमा मंडळ कार्यालयाकडे दाखल करण्यात आले आहे.

तसेच कारखाना व्यवस्थापनाने ३ मृत कामगारांच्या वारसास प्रत्येकी रुपये ६.०० लक्ष आणि २२ जखमी कामगारांना एकत्रितपणे रुपये ९,४०,०००/- इतकी रक्कम सानुग्रह अनुदानापोटी दिली आहे. कारखाना व्यवस्थापनाने ३ मृत कामगारांच्या वारसास नोकरी देऊ केली आहे.

जखमी कामगारांच्या औषधोपचाराचा रुपये २९,९२,१८४/- इतका खर्च व्यवस्थापनामार्फत करण्यात आला आहे.

-----------------

## राज्यातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील रिक्त पदे भरण्याबाबत

**(८) * १७३६८ श्री.अमोल मिटकरी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.सतिश चव्हाण, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.राजेश राठोड, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.जयंत आसगावकर, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.रमेशदादा पाटील, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रवीण दटके :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागांतर्गत वर्ग १ ते वर्ग ४ ची ४५०० पदे रिक्त आहेत, राज्यातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये वैद्यकीय शिक्षकांची १४३२ पदे रिक्त आहेत तसेच राज्यात शासन अनुदानित आयुर्वेदीक महाविद्यालयामध्ये सुमारे २७० पेक्षा अधिक अध्यापकांची विविध पदे मागील ६ वर्षापासून रिक्त असून सदर पदे तात्काळ भरण्यात येतील असे मा.वैद्यकीय शिक्षण मंत्री महोदयांनी माहे नोव्हेंबर, २०२२ मध्ये जाहीर केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, औरंगाबाद घाटी रुग्णालयातील बेडची मान्य संख्या ११७७ आहे ती १३०० ने वाढवून २५०० बेड करण्याची मागणी असून औरंगाबाद घाटी रुग्णालयातील वर्ग १ ते वर्ग ४ ची रिक्त असलेली तांत्रिक / अतांत्रिक १७२३ पदे भरणेसाठी घाटी प्रशासनाने वरिष्ठ कार्यालयाकडे दोन वर्षापूर्वी प्रस्ताव सादर केला त्यावर अद्याप काहीही कार्यवाही झाली नाही, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व सर्वोपचार रुग्णालय, अकोला येथील सुपर स्पेशालिटी या रुग्णालयासाठी २२३ पदांना जानेवारी, २०२१ मध्ये पदांना परवानगी देण्यात आली परंतु ही पदे अद्यापही भरण्यात आली नसून गत २० वर्षांमध्ये काळानुरुप तसेच मानकानुसार खाटांची संख्या १०८० इतक्या खाटांच्या संख्येने कार्यान्वित आहे, अकोला,बुलढाणा, वाशिम,हिंगोली तसेंच अमरावती जिल्ह्यातील मोठी रुग्ण संख्या असताना परिचर्या संवर्गाची एकूण ९० पदे रिक्त असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, वैद्यकीय प्राध्यापक, वैद्यकीय अधिकारी, तंत्रज्ञ, औषधनिर्माण अधिकारी, प्रयोगशाळा सहाय्यक अशी महत्वाची पदे रिक्त असल्याने ठाणे, पालघर, रायगड जिल्ह्यांतील आरोग्य व्यवस्थेवर परिणाम होत असून असल्यास, या तिन्ही जिल्ह्यांतील सर्वाधिक रिक्त पदांची संख्ये १९५ इतकी असून यामध्ये ठाणे जिल्ह्यातील सर्वाधिक ८६ रिक्त पदे आहेत, हे ही ही खरे आहे काय,

(५) असल्यास, नागपूर येथील मेडिकल व मेयो या दोन शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात प्राध्यापक व सहाय्यक प्राध्यापकांची पदे रिक्त असून नागपूरसह राज्यातील प्राध्यापकांच्या २१६ तर सहाय्यक प्राध्यापकांच्या ३०६ पदांच्या भरती प्रक्रियेस विलंब होत असतानाच कंत्राटी शिक्षकांना कायम करण्याची प्रक्रिया होत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे हे ही खरे आहे काय,

(६) राज्यातील वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालयाच्या अधिनस्त असलेल्या शासकीय वैद्यकीय, आयुर्वेद, होमिओपॅथिक महाविद्यालय व रुग्णालयांकरिता गट क व ड संवर्गातील कुशल, अकुशल, अर्धकुशल अशी ५ हजार ५६ मंजूर पदे कंत्राटी पध्दतीने भरण्यात येणार असल्याचे माहे जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले असून अद्यापपर्यंत किती पदे भरण्यात आली आहेत,

(७) असल्यास, शासन निर्णयानुसार आकृतिबंधाप्रमाणे सुधारीत पदवाढीचा प्रस्ताव महाराष्ट्र राज्य परिचारिका संघटनाकडून शासनास वेळोवेळी सादर करण्यात येऊनही अद्यापपर्यंत कोणतीही कार्यवाही झाली नसून अधिष्ठांतापासून सहाय्यक प्राध्यापकांचीही रिक्त पद भरतीबाबत शासनाने निर्णय घेवून रिक्त पदे तातडीने भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन :** (१) अंशत: खरे आहे.

(२) शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, औरंगाबाद येथील रुग्णखाटांची संख्या वाढविण्याची कार्यवाही सुरू आहे. तसेच गट-अ ते गट-क मधील रिक्त पदे सरळसेवेने व पदोन्नतीने भरण्याची तसेच गट-ड मधील पदे जिल्हा निवड समितीमार्फत भरण्याची कार्यवाही सुरू आहे.

(३) हे अंशत: खरे आहे.

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व अतिविशेषोपचार रुग्णालय, अकोला करिता निर्माण केलेली गट-अ व गट-ब ची रिक्त पदे सरळसेवा व पदोन्नतीने शासन स्तरावरुन तसेच गट-क मधील रिक्त पदे संचालनालयाच्या स्तरावरुन आणि गट-ड मधील रिक्त पदे जिल्हा निवड समितीमार्फत भरण्याची कार्यवाही सुरू आहे.

सार्वजनिक आरोग्य संचालनालयाच्या अधिनस्त अकोला, बुलढाणा, वाशिम, हिंगोली तसेच अमरावती जिल्हातील रुग्णालयांमधील परिचर्या संवर्गातील रिक्त पदे भरण्याची कार्यवाही सुरू आहे.

(४) अंशत: खरे आहे.

सार्वजनिक आरोग्य संचालनालयाच्या अधिनस्त ठाणे, पालघर व रायगड येथील रुग्णालयातील रिक्त पदांचा कंत्राटी तत्वावर राष्ट्रीय आरोग्य अभियानातंर्गत मनुष्यबळ उपलब्ध करून देण्यात येते. तसेच रिक्त पदे भरण्याबाबत शासन स्तरावरुन कार्यवाही सुरू आहे.

(५) शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नागपूर व इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नागपूर सह अन्य शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील अध्यापकीय पदांबाबत सरळसेवेन व पदोन्नतीने सन २०२१-२२ या वर्षात प्राध्यापक-२०७, सहयोगी प्राध्यापक-२८१ व सहायक प्राध्यापक-५२४ इतकी पदे भरण्यात आली आहेत. तद्नंतर होणारी रिक्त पदे नियमानुसार भरण्याची कार्यवाही सुरू आहे.

(६) वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालयाच्या अधिपत्याखालील शासकीय वैद्यकीय, आयुर्वेद, होमीओपॅथिक महाविद्यालय व रुग्णालयांकरिता गट-क व गट-ड या संवर्गातील कुशल, अकुशल व अर्ध कुशल अशी एकूण ५०५६ पदे बाहयस्त्रोतामार्फत भरण्याकरिता शासन निर्णय दिनांक २०/०१/२०२३ अन्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे. त्यानुसार कार्यवाही संचालनालयाच्या स्तरावर सुरू आहे. तसेच शासन निर्णय सा.प्र.वि. दिनांक ०४/०५/२०२२ व दिनांक २१/११/२०२२ अन्वये दिलेल्या निर्देशानुसार गट-क संवर्गाची सरळसेवेची पदे भरण्यासाठी आयुक्त (वैद्यकीय शिक्षण व संशोधन) यांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय समिती गठीत करण्यात आली आहे. वैद्यकीय शिक्षण विभागाच्या अधिनस्त गट-क ची सरळसेवेची पदभरतीची प्रक्रिया टी.सी.एस.आय. ओ.एन. मार्फत करण्याचे प्रस्तावित आहे. तसेच गट-ड संवर्गाची पदे जिल्हा स्तरीय निवड समितीमार्फत भरण्याकरिता सर्व अधिष्ठाता तसेच संबंधित जिल्हाधिकारी यांना सूचना देण्यात आल्या आहेत.

(७) महाराष्ट्र राज्य परिचर्या संघटनेकडून या संदर्भात प्रस्ताव प्राप्त झालेला नाही. सहायक प्राध्यापक (परिचर्या) संवर्गात ११ पदे पदोन्नतीने भरण्यात आली असून ८ पदांबाबत महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे जाहिरात प्रसिध्द झाली असून पदभरती प्रक्रिया सुरू आहे. राज्यातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील सरळसेवा व पदोन्नतीने सन २०२१-२२ या वर्षात अधिष्ठाता-११, प्राध्यापक-२०७, सहयोगी प्राध्यापक-२८१ व सहायक प्राध्यापक-५२४ इतकी पदे भरण्यात आली आहेत. तद्नंतर होणारी रिक्त पदे भरण्याची कार्यवाही शासनस्तरावर सुरू आहे.

-----------------

## राज्यातील आय.टी.आय. मधील तासिका शिल्पनिदेशक व गटनिदेशक यांच्या सेवा कायम करण्याबाबत

**(९) * १७१३५ श्री.किरण सरनाईक, श्री.जयंत आसगावकर, श्री.कपिल पाटील :** सन्माननीय **कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील आय.टी.आय.मधील अनुभवी तासिका शिल्पनिदेशकांना नोकरीत सुरक्षा मिळत नसल्याची बाब माहे जानेवारी, २०२३ च्या पहिल्या सप्ताहात वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील ठोक मानधनावर कार्यरत ३०९ शिल्पनिदेशक व गट निदेशक या शिक्षक कर्मचाऱ्यांच्या सेवा नियमित करणेबाबत दिनांक ८ मे, २०१८ रोजी वा त्यादरम्यान झालेल्या बैठकीत मंत्रिमंडळ उपसमितीने शिफारस केली आहे काय, असल्यास उपसमितीने केलेल्या शिफारशींचे स्वरुप काय आहे,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तदनुसार शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील ठोक मानधनावर कार्यरत ३०९ शिल्पनिदेशक व गटनिदेशक या शिक्षक कर्मचाऱ्यांच्या सेवा नियमित करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.मंगलप्रभात लोढा :** (१) व (२) शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील तासिका तत्वावरील शिल्प निदेशकांना तात्पुरत्या स्वरुपात कंत्राटी पध्दतीने ३ वर्षाकरिता नियुक्ती देणेबाबत निवेदने शासनास प्राप्त झालेली आहेत.

कौशल्य विकास विभागाच्या अखत्यारितील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये कंत्राटी निदेशक पदावर कार्यरत असलेल्या एकूण ३२६ कर्मचाऱ्यांना सध्या रिक्त असलेल्या पदावर नियमित सेवेत सामावून घेण्याबाबत प्रस्ताव मंत्रीमंडळासमोर ठेवून त्यावर मंत्रीमंडळाने निर्णय घ्यावा, अशी शिफारस मंत्रिमंडळ उपसमितीने केली आहे.
(३) शिल्पनिदेशकांनी नियमित नियुक्ती मिळणेबाबत न्यायालयात दाखल केलेल्या याचिकेच्या अनुषंगाने मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई यांनी दिनांक २७ ऑगस्ट, २०१९ रोजीच्या अंतिम निर्णयानुसार अर्जदारांना नियमित पदावर नियुक्तीचा हक्क राहणार नाही, असा अंतिम निर्णय दिलेला आहे.

सदर ३०९ शिक्षकीय पदधारकांची पदे ही कंत्राटी स्वरुपाची असल्याने नियमित रिक्त पदावर त्यांचे समायोजन करता येत नाही. तथापि, सदर कर्मचाऱ्यांचे मानधन वाढविण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधिन आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नंदुरबार जिल्ह्यासाठी शासनाने उपलब्ध करुन दिलेल्या रुग्णवाहिकेसाठी चालक व ऑक्सिजन मशिन ऑपरेटर उपलब्ध करुन देण्याबाबत

**(१०) * १७५२६ श्री.आमश्या पाडवी :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोरोना काळात रुग्णांना तातडीने रुग्णसेवा मिळावी याकरिता नंदुरबार जिल्ह्यासाठी शासनाने रुग्णवाहिका उपलब्ध करुन दिल्या होत्या, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त रुग्णवाहिके साठी चालक व ऑक्सीजन मशिन ऑपरेटर उपलब्ध करुन देण्यात आले नसल्यामुळे सदर रुग्णवाहिंका विनावापर पडून आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने लाखो रुपये खर्च करुन रूग्णवाहिका खरेदी करुनही रुग्णवाहिका चालक व ऑक्सीजन मशिन ऑपरेटर नसल्यामुळे रुग्णवाहिकांअभावी जिल्ह्यातील अनेक रुग्णांचा मृत्यू झालेला असून याप्रकरणी चौकशी करुन दोषींवर कारवाई करण्यात यावी अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.सार्वजनिक आरोग्य मंत्री यांच्याकडे दिनांक ०६ सप्टेंबर २०२२, १३ सप्टेंबर, २०२२ व तदृनंतर दिनांक १२ नोव्हेंबर, २०२२ रोजी स्मरणपत्राद्वारे करुनही अद्याप कोणतीच कारवाई झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने नंदुरबार जिल्ह्यातील रुग्णांना तातडीने रुग्णवाहिका चालक व रुग्णवाहिकेमध्ये ऑक्सिजन मशीन ऑपरेटर उपलब्ध व्हावा यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) हे खरे आहे.

(२) नाही.

(३) कोरोना काळात खरेदी करण्यात आलेल्या रुग्णवाहिकांसाठी कंत्राटी तत्वावर वाहन चालक उपलब्ध करुन देण्यात आलेले आहेत. या रुग्णवाहिका Patient Transport Ambulance असून त्यासाठी ऑक्सिजन मशीन ऑपरेटरची आवश्यकता नसते. रुग्ण संदर्भित करताना रुग्णास ऑक्सिजनची आवश्यकता भासल्यास ऑक्सिजन सिलेंडरची व्यवस्था करण्यात येते. त्यामुळे वाहन चालक आणि ऑक्सिजन मशीन ऑपरेटर नसल्यामुळे रुग्णांचा मृत्यू झाला ही बाब खरी नाही.

दिनांक ०६/०९/२०२२ व दिनांक १३/०९/२०२२ ची पत्रे प्राप्त झाली असून त्या अनुषंगाने आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई यांना योग्य ती चौकशी करुन शासनास अहवाल सादर करण्याबाबत कळविण्यात आले आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## जिल्हा परिषद नर्सेस संवर्गाच्या प्रलंबित मागण्या पूर्ण करण्याबाबत

**(११)** * **१७२३५ श्री.कपिल पाटील :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जिल्हा परिषद नर्सेस संघटनांनी नर्सेसची व्यपगत पदे पुन्हा सुरु करणे, एएनएम पदांची पदस्थापना करणे, नर्सेस संवर्गातील नियमित पदे वाढविणे, कंत्राटीकरण रद्द करणे यांसह अन्य मागण्यांबाबत माहे डिसेंबर, २०२२ रोजी वा त्यादरम्यान नागपूर येथे आंदोलन केले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने जिल्हा परिषद नर्सेस संघटनांनी केलेल्या मागण्यां मान्य करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन :** (१) होय, हे खरे आहे.

(२) जिल्हा परिषदेअंतर्गत आरोग्य विभागामधील आरोग्यसेविका (महिला) आणि आरोग्य सहाय्यक (महिला) च्या संवर्गातील कोणतेही पद व्यपगत करण्यात आले नाही. तथापि, या संवर्गातील रिक्त पदे सरळसेवेने भरण्याच्या अनुषंगाने ग्रामविकास विभाग शासन निर्णय क्र. संकिर्ण २०२२/प्र.क्र.११/आस्था-८, दिनांक २१/१०/२०२२ अन्वये भरती प्रक्रियेची कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील जिल्हा परिषदेमधील विविध सवंर्गातील पदांची भरती प्रक्रिया पूर्ण करण्याबाबत

**(१२) * १७३२४ श्री.राजेश राठोड, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.जयंत आसगावकर, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्री.महादेव जानकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.रमेशदादा पाटील, श्री.अरुण लाड, श्री.अनिकेत तटकरे, श्री.शशिकांत शिंदे, श्री.अमोल मिटकरी, श्री.सतिश चव्हाण, श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.रामदास आंबटकर, श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने जिल्हा परिषदांमध्ये रिक्त असलेल्या पदांसाठी भरती प्रक्रिया सन २०१५ मध्ये राबविण्याचा निर्णय घेण्यात येऊनही जिल्हा परिषदांमधील रिक्त पदांची भरती प्रक्रिया, पोलीस भरती, अंगणवाडी सेविका भरती, नगरपालिका व महानगरपालिका भरती जाहीर केलेली असतानाही सर्व भरतीप्रकीया अद्यापही प्रलंबित असून नागपूर जिल्हा परिषद अंतर्गत महाराष्ट्र विकास सेवा गट ‘अ’ व गट ‘ब’ तथा अन्य विभागाअंतर्गत असलेल्या गट ‘ब’ ची रिक्त पदे तातडीने भरण्याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. नागपूर यांनी प्रस्ताव संबंधित विभागाला सादर केलेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्तावात जि.प. अंतर्गत महाराष्ट्र विकास सेवा गट ‘अ’ व गट ‘ब’ ची ९ पदे, मृद व जलसंधारण विभाग अंतर्गत गट ‘ब’ ७ पदे, बांधकाम विभागांतर्गत गट ‘ब’ २ पदे, आरोग्य विभागांतर्गत गट ‘ब’ चे ४ पदे, वित्त विभागांतर्गत गट ‘अ’ (कनिष्ठ) १ पद, शिक्षण विभागांतर्गत गट ‘ब’ १६ पदे रिक्त असल्याने जि.प. प्रशासन व पर्यायाने विकास कामावर परिणाम होत असून कामे प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील ग्रामविकासांतर्गत जिल्हा परिषदेतील आरोग्य विभागातील जवळपास १३००० जागांकरिता सन २०१८ मध्ये भरती प्रक्रिया ये सुरू करण्यात आली असून, भरती प्रक्रियेकरिता सुमारे ११.५ लाख अर्ज प्राप्त झाले असून आरक्षणाच्या समस्येमुळे महा ई पोर्टल रद्द केल्यामुळे ही भरती प्रक्रिया रद्द करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान ग्रामविकास विभागांतर्गत आरोग्य विभागाशी संबंधित १०,१२७ जागांच्या भरतीची घोषणा केली असून भरती प्रक्रियेची सद्य:स्थिती काय आहे, तसेच जिल्हा परिषद भरतीसाठी अर्ज भरलेल्या उमेदवारांचे वय दिवसेंदिवस वाढत असून भरती प्रक्रिया होत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, दिनांक ४ नोव्हेंबर रोजी वा त्यासुमारास पुणे जिल्हा परिषद अंतर्गत १३,५२१ पदांची सरळ सेवा भरती पुणे जिल्हा परिषदेने घोषीत करुन उमेदवारांकडून अर्ज प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी काही शुल्क आकारुन अर्ज मागविले, सदरहू भरतीसाठी राज्यभरातून १२,७२,३१९ उमेदवारांनी ऑनलाईन अर्ज केले असून परीक्षा शुल्कापोटी रुपये २५ कोटी ८७ लाख शासनाकडे जमा केले आहेत, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, वर्धा जि.प. अंतर्गत वर्ग 'क' व 'ड' ची एकूण ५,२०४ पदापैकी सामान्य प्रशासन, वित्त, पंचायत, आरोग्य, कृषी, पाटबंधारे विभागांची ९७६ पदे रिक्त असल्याचे दिनांक २० ऑक्टोबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले असून दिनांक २६ मार्च २०१९, १४ जून, २०२१, २८ ऑगस्ट, २०२१ व दिनांक २१ ऑक्टोबर, २०२२ रोजी वेळापत्रक जाहीर करुन पुन्हा त्या परीक्षा रद्द केल्यामुळे परीक्षा त्वरित घेऊन सदर भरती प्रक्रिया तात्काळ सुरु करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन :** (१) अंशत: खरे आहे.
(२) अंशत: खरे आहे.
(३) हे खरे आहे.
(४), (५) व (६) ग्रामविकास विभागाच्या अखत्यारितील राज्यातील सर्व जिल्हा परिषदांकडील गट - क मधील १८ संवर्गातील एकूण १३,५१४ इतकी रिक्त पदे ऑनलाईन पध्दतीने भरण्यासाठी शासनाच्या महाआयटी मार्फत माहे मार्च, २०१९ मध्ये अर्ज मागविण्यात आले असता एकूण १२,७२,३१९ अर्ज प्राप्त झाले असून परीक्षा शुल्कापोटी शासनाकडे रूपये २५,००,८७,९४१/- प्राप्त झाले आहेत.

सदर परीक्षा महापरीक्षा पोर्टल रद्द झाल्यामुळे होऊ शकली नाही.

ग्रामविकास विभागाच्या अखत्यारितील जिल्हा परिषदे अंतर्गत गट - क मधील आरोग्य व इतर विभागातील संवर्गाच्या पदभरतीचा कालबध्द कार्याक्रम विभागाच्या अनुक्रमे दिनांक २१ ऑक्टोबर, २०२२ व दिनांक १५ नोव्हेंबर, २०२२ च्या शासन निर्णयान्वये जाहीर करण्यात आला होता.तथापि, सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक २१ नोव्हेंबर, २०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये दिलेल्या निर्देशानुसार परीक्षा टि.सी.एस. / आ.बी.पी.एस. या कंपन्याद्वारे ऑनलाईन पध्दतीने घ्यावयाच्या आहेत. त्यानुसार जिल्हा परिषद स्तरावर आय.बी.पी.एस. या कंपनीसोबत सामंजस्य करार (MOU) अंतिम करण्याची कार्यवाही सुरू आहे. तद्नंतर Application Portal विकसित करून लवकरच जिल्हा परिषद स्तरावर जाहिरात प्रसिध्द करण्यात येणार आहे.

तसेच दिनांक २१ ऑक्टोबर, २०२२ च्या जाहिरातीनुसार ज्या उमेदवारांनी यापूर्वी अर्ज केलेले / भरलेले आहेत, व सध्या वयाधिक्य झाले असल्याने ते परिक्षेस बसण्यास अपात्र होऊ नये, याकरिता अशा उमेदवारांचे अर्ज स्वीकरून पुढील फक्त एका परिक्षेस बसण्याकरिता अशा उमेदवारांना वयोमर्यादेत सूट देण्यात आली आहे.

-----------------

## त्र्यंबकेश्वर (जि.नाशिक) येथील आधारतीर्थ आश्रमामध्ये बालकाचा मृत्यू झाल्याबाबत

**(१३)** * **१७८४४ श्री.श्रीकांत भारतीय :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक त्र्यंबकेश्वर रोडवरील आधारतीर्थ या आश्रमामध्ये एका साडेतीन वर्षीय बालकाचा मृत्यू झाल्याची घटना घडल्याचे माहे, नोव्हेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर आश्रमाला बालकल्याण समितीने मान्यता दिली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर आश्रमामधील बालगृहांमध्ये सुरक्षेच्या दृष्टीने संबंधित व्यवस्था करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, आधारतीर्थ आश्रमात यापूर्वीही घडलेल्या अशा घटनांबाबत विभागामार्फत कारवाई करण्यात आली आहे काय, सदर घटनांची पुनरावृत्ती होऊ नये यादृष्टीने शासनाने घेतलेल्या निर्णयाचे स्वरुप काय आहे,
(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने राज्यात बालगृहांच्या माध्यमातून चालविण्यात येणाऱ्या आधारतीर्थ आश्रमासह इतर आश्रमातील बालकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने व्यवस्था न ठेवणाऱ्या बालगृहांवर व संबंधित दोषींवर कारवाई करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.मंगलप्रभात लोढा :** (१), (२) व (३) होय, हे खरे आहे,
(४) सदर संस्थेच्या बालकाश्रमाची मान्यता दिनांक २२/११/२०१३ रोजी रद्द करण्यात आली. तदनंतर सदर संस्था अनधिकृतपणे सुरु होती. त्याबाबत पोलीस विभागाकडे तक्रार करण्यात आली आहे. सदर घटनांची पुनरावृत्ती होऊ नये म्हणून सर्व जिल्हाधिकारी यांना संस्था तपासणी करण्याबाबत कळविले आहे.
(५) सदर आश्रमाची दिनांक २३/११/२०२२ रोजी शासनाकडून चौकशी करण्यात आली असून सदर आश्रम अनधिकृत असल्याचे आढळुन आले आहे. अनधिकृत संस्थाबाबत कार्यवाही करण्याबाबत पोलीस आयुक्त व पोलीस अधीक्षक यांना विनंती करण्यात आली आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पवनी (जि.भंडारा) गावाला पर्यटनाचा दर्जा देण्याबाबत

**(१४) * १७८१९ श्रीमती उमा खापरे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.रमेशदादा पाटील, श्री.प्रवीण दटके, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्री.प्रसाद लाड, श्री.महादेव जानकर :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पवनी (जि.भंडारा) गावात विविध देवदेवतांची २५० मंदिरे असून या ठिकाणास पर्यटनाचा दर्जा नसल्यामुळे पवनी गाव पर्यटनाच्या सेवा सुविधांपासून वंचित असल्याचे माहे जानेवारी, २०२३ च्या पहिल्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पवनी गावातील सर्व जुन्या मंदिरांची दुरुस्ती देखभाल करून पर्यटनासाठी उपलब्ध करून देण्यासाठी शासनाने कृती आराखडा तयार केला आहे काय,
(३) असल्यास, भंडारा जिल्ह्यातील सर्वात जुनी नगरपालिका असलेल्या पवनी गावाला तीर्थक्षेत्राचा दर्जा देऊन येथील तरुणांसाठी रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यात येणार आहेत काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने पवनी (जि.भंडारा) या गावाला तीर्थक्षेत्राचा दर्जा देऊन येथील तरुणांसाठी रोजगाराच्या संधी उपलब्ध करुन देण्याबाबत तसेच पवनी गावातील सर्व जुन्या मंदिरांची दुरुस्ती देखभाल करुन पर्यटनासाठी उपलब्ध करुन देण्यासाठी कृती आराखडा तयार करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.मंगलप्रभात लोढा :** (१) नाही. पवनी या ठिकाणास ‘क’ वर्ग पर्यटनस्थळाचा दर्जा देण्यात आलेला आहे.
(२) पवनी शहरातील मंदिरांची देखभाल दुरुस्तीकरिता जिल्हा नियोजन समितीमार्फत मुख्याधिकारी, नगरपरिषद पवनी यांना आराखडा तयार करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.
(३) व (४) पवनी या ठिकाणास ‘क’ वर्ग पर्यटनस्थळाचा दर्जा देण्यात आलेला आहे. पवनी शहराला ‘ब’ वर्ग तिर्थक्षेत्राचा दर्जा देण्याच्या अनुषंगाने नगरविकास विभागाने विभागीय आयुक्त, नागपूर यांच्याकडून प्रस्ताव मागविला आहे.

प्रादेशिक पर्यटन विकास योजनेंतर्गत पवनी शहरातील (१) बलसमुद्र व बुध्दिष्ट पुरातत्वीय स्थळी येथे पर्यटन सुविधा निर्माण करणे, (२) भाईतलाव खोलीकरण व सौंदर्यीकरण करणे या अनुक्रमे रुपये २९२.०० लक्ष व रुपये १२५.०० लक्षच्या कामांना मान्यता देण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात विशेषत: पालघर, ठाणे, नाशिक व अहमदनगर जिल्ह्यात आदिवासी समाजाच्या लहान मुलांकडून वेठबिगारी करून घेण्यात येत असल्याबाबत

**(१५) * १७४४८ श्री.रमेशदादा पाटील, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.नरेंद्र दराडे :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील विशेषत: नाशिक, अहमदनगर, ठाणे, पालघर अशा अनेक जिल्ह्यातील आदिवासी, कातकरी समाजातील लहान मुला-मुलींना वेठबिगारीसाठी विकल्याची अनेक प्रकरणे निदर्शनास आली असून उभाडे (ता.इगतपुरी, जि.नाशिक) येथील आदिवासी पाड्यातील १० वर्षाच्या मुलीचा वेठबिगारीमुळे मुत्यू झाल्याची घटना माहे सप्टेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२)असल्यास, भिवंडी (जि.ठाणे) येथे दोन मुलांची तसेच जव्हार (जि.पालघर) येथील दोन आदिवासी अल्पवयीन मुलींना गहाण ठेऊन त्यांच्यांकडून नगर जिल्ह्यातील तळेगांव येथे वेठबिगारीचे कामे देवून झालेल्या त्रासामुळे दोन मुलींपैकी एक मुलगी बेपत्ता असल्याचे व एका मुलीचा मुत्यू झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३)असल्यास, पालघर, जव्हार, मोखाडा तालुक्यातील कातकरी आदिवासी कुटुंबात वेठबिगारीची अनेक प्रकरणे घडत असून पालघर जिल्ह्यातील दोन मुलींना एका सावकाराने नगर जिल्ह्यातील तळेगाव येथे किरकोळ पैशात गहाण ठेवले असल्याची घटना माहे सप्टेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान घडली असल्याचे निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शाळेत जाण्याच्या वयात या मुलींना जनावराची विष्टा उचलणे, शेळी मेंढ्या चरावयास नेणे, आदी काम करून घेतली जात आहेत, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, सदर प्रकरणी कामगार आयुक्त कार्यालयामार्फत चौकशी करण्यात आली आहे काय, तसेच संबंधित जिल्हादंडाधिकारी यांचेकडे तात्काळ वेठबिगार दक्षता समितीची बैठका घेऊन, महसूल विभाग, शिक्षण विभाग, आदिवासी विभाग, पोलीस विभाग यांना त्यांच्या स्तरावर आवश्यक ती कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, उपरोक्त जिल्ह्यांमध्ये घडलेल्या वेठबिगारीच्या घटनांची चौकशी करण्यात आली आहे काय, त्यानुषंगाने वेठबिगारींच्या प्रकारांना आळा घालण्यासाठी तसेच त्यांचे मूलभूत प्रश्न सोडवून त्यांना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी तसेच राज्यातील अशा आदिवासी लहान मुलांची सावकाराच्या तावडीतून सुटका करून त्यांना शाळेत पाठविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. सुरेश (भाऊ) खाडे :** (१) होय हे खरे आहे.
(२) ठाणे आणि पालघर जिल्ह्यातील ४ बालके अनुक्रमे नाशिक व अहमदनगर जिल्ह्यात आढळून आले आहेत.

त्यापैकी १ बालकांस वेठबिगार म्हणून घोषित करण्यात आले असून, उर्वरीत ३ बालके वेठबिगार नसल्याचे संबंधित तहसिलदार यांचेमार्फत घोषित करण्यात आले आहे. तसेच यापैकी कोणाचाही मृत्यू झालेला नाही अथवा कोणीही बेपत्ता झाले नसल्याचे निदर्शनास आले आहे.
(३) अंशत: खरे आहे.

पालघर जिल्ह्यातील दोन मुलींपैकी १ मुलगी वेठबिगार असल्याचे आणि दुसरी मुलगी ही वेठबिगार नसल्याचे संबंधित तहसिलदार यांचेमार्फत घोषित करण्यात आले आहे.
(४) मेंढपाळ व्यावसायिक बालकांकडून मेंढया वळण्याचे काम करून घेण्यात येत असल्याचे निदर्शनास आले आहे.
(५) व (६) होय हे खरे आहे.

आढळून आलेल्या कामगारांपैकी वेठबिगार म्हणून घोषीत केलेल्या बालक/व्यक्तींना संबंधित जिल्हाधिकारी यांचेमार्फत प्रत्येकी रुपये ३०,०००/- प्रमाणे रक्कम देण्यात आली आहे.

याशिवाय सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या दिनांक २३/१२/२०१६ रोजीच्या शासन निर्णयाप्रमाणे पहिला हप्ता ५०% प्रमाणे रुपये ४,१२,५००/- इतके आर्थिक सहाय्य मृत गौरी सुरेश आगविले हिच्या वारसदार आई श्रीमती तुळसाबाई सुरेश आगविले यांना मंजूर करण्यात आले आहे.

मुक्तता केलेल्या बाल कामगारांपैकी काही बालकांना संबंधित जिल्ह्यातील आदिवासी विकास विभागाच्या आश्रम शाळेत दाखल करण्यात आले आहे. तसेच काही बालके त्यांच्या पालकांकडे सुपूर्द करण्यात आले असून,उर्वरीत बालकांनी शाळेत जाण्यास नकार दिला आहे.

वेठबिगार कामगारांबाबत उपाययोजना व मदत करण्याच्या दृष्टीने जिल्हास्तरीय वेठबिगार दक्षता समितीच्या वेळोवेळी बैठका आयोजित करण्यात आल्या असून, वेठबिगार कामगारांचा शोध घेणे तसेच औद्योगिक आस्थापना, नागरिकांमध्ये जनजागृती करण्याच्या दृष्टीने महसूल विभाग, पोलीस विभाग व

कामगार विभाग पथकामार्फत वेगवेगळया आस्थापनांना भेटी दिल्या जात आहेत. भेटीदरम्यान आस्थापना मालक व वीटभट्टी मालकांकडून वेठबिगार व बाल कामगार काम करीत नाहीत तसेच भविष्यातही कामावर ठेवणार नाही असे हमीपत्र भरून घेतली जात आहेत.

-----------------

## राज्यातील अंगणवाड्यांमधील बालकांचे आधार सिडींग करण्याबाबत

**(१६) * १७५२० श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील, श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पोषण ट्रॅकर ॲपवर अंगणवाड्यांमधील प्रत्येक बालकाचे आधार सिडींग करणे अंगणवाडी सेविकांना बंधनकारक असून राज्यातील अंगणवाड्यांमधील ७० लाख ७५ हजार बालकांपैकी ३७ लाख १७ बालकांचे आधार सिडींग झालेले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील अंगणवाड्यांची संख्या सुमारे १.१० लाख इतकी असून त्यामध्ये नोंदणीकृत विद्यार्थी ७० लाख ७५ हजार आहेत व आधार सीडींग झालेली मुले ३३.५८ लाख असून आधार सिडिंग न झालेली मुले ३३ लाख ५८ हजार एवढी असून सदर आधार सीडिंग न झालेल्या मुलांना पोषण आहाराचे धान्य मिळणार नसल्याची माहिती अहवालातून निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दिनांक १५ जानेवारी, २०२३ रोजीपर्यंत आधार सिडींगचे काम पूर्ण न झाल्यास केंद्र सरकारच्या निकषानुसार संबंधित बालकांचे मिळणारे धान्य बंद होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने आधार सिडींग प्रक्रिया लवकरात लवकर पूर्ण होण्याच्या दृष्टीने व बालकांस हक्काचे व मोफत पोषण आहार तसेच धान्य मिळण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.मंगलप्रभात लोढा :** (१) व (२) राज्यातील ७५,६४,५१० लाभार्थ्यांपैकी दिनांक १६/०२/२०२३ पर्यंत ६५,७२,५६८ बालकांचे (८७ %) आधार पडताळणी पूर्ण झाले आहे. केंद्र सरकारच्या दिनांक २०/१२/२०२२ च्या पत्रानुसार जे लाभार्थी आधार पडताळणी झालेले असतील अश्याच लाभार्थ्यांचे अनुदान देय राहणार आहे. त्यामुळे १००% लाभार्थ्यांचे आधार पडताळणी होणे आवश्यक आहे. त्यादृष्टीने राज्य शासनामार्फत १००% लाभार्थ्यांचे आधार पडताळणी करण्याचे काम सुरु आहे. आधार पडताळणी नसल्यास पोषण आहार देण्यात येऊ नये अशा कोणत्याही प्रकारच्या सुचना शासनाकडून क्षेत्रिय अधिकाऱ्यांना देण्यात आलेल्या नाहीत.

(३) हे खरे नाही.

दिनांक १६/०२/२०२३ पर्यंत ८७ % लाभार्थ्यांची आधार पडताळणी पूर्ण झाली आहे व लवकरच १००% काम पूर्ण करण्याचे प्रयत्न सुरु आहेत.

(४) आधार पडताळणीचे काम लवकरात लवकर पूर्ण होण्यासाठी राज्यातील जिल्हा कार्यक्रम अधिकारी (महिला व बालविकास) व बालविकास प्रकल्प अधिकारी यांची दर आठवड्याला Online बैठक घेण्यात येत आहे. त्यानुसार जिल्हा कार्यक्रम अधिकारी (महिला व बालविकास) व बालविकास प्रकल्प अधिकारी यांचेकडून सदर कार्यवाही प्राथम्याने करण्यात येत आहे. याबाबत आयुक्त, एकात्मिक बालविकास सेवा

योजना यांचेमार्फत नियमित पाठपुरावा करण्यात येत आहे. राज्यात माहे सप्टेंबर मध्ये आधार पडताळणीचे काम ३७ % होते व १६ फेब्रुवारी २०२३ पर्यंत ८७ % काम पूर्ण झालेले आहे. लवकरच १०० % काम पूर्ण करण्यात येईल व लाभार्थी पोषण आहारापासून वंचित राहणार नाही याची दक्षता घेण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## हिंगोली जिल्ह्यातील ग्रामीण भागातील विविध योजनांमधील प्रलंबित घरकुलांची कामे पूर्ण करण्याबाबत

**(१७) * १७७४१ डॉ.प्रज्ञा सातव : तारांकित प्रश्न क्रमांक १२५२८ ला दिनांक ११ मार्च, २०२२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१)हिंगोली जिल्ह्यातील ग्रामीण भागात विविध योजनांमधील ४१८१ घरकुलांची कामे प्रलंबित असून त्यात कळमनुरी तालुक्यातील १०२२ घरकुलांचा समावेश असल्याची बाब माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन प्रलंबित असलेल्या घरकुलांची कामे सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन :** (१) अंशत: खरे आहे.
(२) हिंगोली जिल्ह्यातील प्रलंबित ४१८१ घरकुलांपैकी १९९८ घरकुलांची कामे पूर्ण झालेली असून २१८३ घरकुलांची कामे प्रगतीपथावर आहेत. त्यात कमळनुरी तालुक्यातील प्रलंबित १०२२ घरकुलांपैकी ६०१ घरकुलांची कामे पूर्ण झालेली असून ४२१ घरकुलांची कामे प्रगतीपथावर आहेत. घरकुलांची कामे पूर्ण करण्यासाठी लाभार्थी मेळावे, ग्रामीण गृहनिर्माण अभियंता (RHE) मार्फत भेटी, लाभार्थ्यांच्या वैयक्तिक गृह भेटी, संपर्क अधिकारी व ग्रामसेवकामार्फत वारंवार घरकुल लाभार्थ्यांना भेटी देवून पाठपुरावा, लोक अदालत व्दारे सुनावणी इ. उपाययोजना करून घरकुले पूर्ण करण्यात आली आहेत. प्रगतीपथावरील घरकुले पूर्ण करण्यासाठी वरीलप्रमाणे उपाययोजना तसेच घरकुल योजनांची अंमलबजावणी गतिमान व गुणवत्तापूर्वक होण्यासाठी राज्यात अमृत महाआवास अभियान राबविण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील माथाडी कायद्याअंतर्गत सुरू असणाऱ्या आस्थापनांमध्ये कायद्याची अंमलबजावणी करण्याबाबत

**(१८) * १७०१६ श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्रीमती उमा खापरे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.रमेशदादा पाटील, श्री.प्रवीण दटके, श्री.रामदास आंबटकर, श्री.रामराव पाटील :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील माथाडी कायद्यांतर्गत सुरू असलेल्या माथाडी स्वरूपाची कामे चालणाऱ्या आस्थापनामध्ये किंवा उद्योगांमध्ये ठेकेदारी पध्दतीत वाढ झाली असून माथाडी स्वरूपाची कामे करणाऱ्या असंरक्षित माथाडी कामगारांना विविध योजनांच्या सुविधा व केलेल्या कष्टाच्या कामाचा १०० टक्के मोबदला मिळण्याकरिता महाराष्ट्र माथाडी, हमाल व इतर श्रमजिवी कामगार (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम १९६९ या कायद्याची निर्मिती करण्यात आलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) राज्यातील माथाडी मंडळाचे वसंत मार्केट यार्ड, सांगली या कार्यालयावर हमाल, तोलईदार यांनी विविध मागण्यांच्या संदर्भात निदर्शने केली असल्याची बाब माहे जानेवारी, २०२३ च्या पहिल्या आठवड्यात वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, माथाडी मंडळाकडील निरीक्षक वयोमानानुसार नऊ महिन्यापूर्वी सेवानिवृत्त झाले असूनही त्यांनी स्वतःच्या सेवा पुस्तकात फेरफार केल्याने शासनाची व मंडळाची फसवणूक केल्याची बाब निदर्शनास आली असून तद्संदर्भात तसेच राज्यातील हमाल, तोलाईदार त्यांच्या मागण्या पूर्ण करण्यासंदर्भात त्यांनी सहाय्यक कामगार आयुक्तांना निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या कायद्यानुसार प्रत्येक आस्थापनांमध्ये कामे करणाऱ्या माथाडी कामगार तसेच आस्थापनांचे मालक, उद्योजक यांनी शासनाच्या विविध व्यवसाय निहाय माथाडी मंडळात नोंदीत होवून मंडळाने निश्चित केलेल्या मजुरीच्या दराची रक्कम लेव्ही सहित मंडळात जमा करणे बंधनकारक असताना मुंबई, नवी मुंबई, ठाणे, भिवंडी, पुणे, कोल्हापूर अशा अनेक ठिकाणी या कायद्याची अंमलबजावणी न करता गैरवापर सुरू आहे, हे ही खरे आहे काय ,

(५) असल्यास, माथाडी कामगारांवर होत असलेला अन्याय दूर करण्यासाठी शासनाने कायद्याची अंमलबजावणी न करणाऱ्या कंत्राटदारांवर तातडीने कारवाई करुन कायद्याची योग्य अंमलबजावणी करणेबाबत तसेच राज्यातील हमाल, तोलाईदार त्यांच्या मागण्या पूर्ण करण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. सुरेश (भाऊ) खाडे :** (१) महाराष्ट्र राज्यातील विवक्षित नोकऱ्यांमध्ये कामावर ठेवलेल्या असंरक्षित श्रमजिवी कामगारांच्या नोकरीचे नियमन करण्यासाठी व अशा नोकऱ्यांमध्ये त्यांचा पुरेसा पुरवठा व्हावा, त्यांचे कल्याण, आरोग्य व सुरक्षिततेचे उपाय योजण्यासाठी तसेच केलेल्या कामाचा मोबदला व त्यावरील लेव्ही मिळण्यासाठी महाराष्ट्र माथाडी, हमाल व इतर श्रमजिवी कामगार (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम १९६९ ची निर्मिती करण्यात आली आहे.

(२) हे खरे आहे.

(३) श्रीमती माने, निरीक्षक यांचे प्रकरणी सांगली जिल्हा हमाल पंचायत या संघटनेने सहायक कामगार आयुक्त तथा अध्यक्ष, सांगली जिल्हा माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ यांचेकडे दिनांक ३०/०१/२०२३ रोजी निवेदन दिले आहे.

तसेच सांगली जिल्हा हमाल पंचायत या संघटनेने दिनांक ०१/०७/२०२२ रोजी हमाल, तोलाईदार यांच्या विषयाबाबतचे निवेदन मंडळास दिले आहे.

(४) हे खरे नाही.

महाराष्ट्र माथाडी, हमाल व इतर श्रमजिवी कामगार (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम, १९६९ अंतर्गत अनुसूचित उद्योगातील नोंदित मालकांकडून मजूरी व लेव्हीचा भरणा मंडळात धनादेश/ आर.टी.जी.एस. व्दारे जमा होत आहे.

(५) माथाडी अधिनियम तसेच मंडळाची योजना यामध्ये तरतुदींची अंमलबजावणी न करणाऱ्या आस्थापनांविरूध्द अधिनियमाच्या कलम १३ अन्वये वसुलीची कार्यवाही त्याचप्रमाणे खंड १४ अथवा खंड ३० अन्वये संबंधित मालकांविरुध्द न्यायालयीन खटले दाखल करण्याची कार्यवाही करण्यात येते.

राज्यातील विविध माथाडी संघटनांकडून वेळोवेळी प्राप्त होणाऱ्या निवेदनाच्या अनुषंगाने मंडळ स्तरावर प्रश्नांची सोडवणूक करण्याचे प्रयत्न करण्यात येतात.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अंधेरी (मुंबई) येथील कामगार रुग्णालय पूर्ववत सुरु करण्याबाबत

**(१९) * १७८८० श्री.शशिकांत शिंदे, श्री.अमोल मिटकरी, श्री.सतिश चव्हाण, श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस, श्री.सचिन अहिर, श्रीमती उमा खापरे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.रमेशदादा पाटील, श्री.रामदास आंबटकर, श्री.रामराव पाटील :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई येथील अंधेरी एम.आय.डी.सी. भागातील राज्य विमा निगम महामंडळाच्या (ईएसआयसी) कामगार रुग्णालयाची सन १९७७ मध्ये स्थापना करण्यात येऊन सन २००८ पर्यंत हे रुग्णालय राज्य शासनाच्या अधिपत्याखाली चालविण्यात येत होते. परंतु ईएसआय कॉर्पोरेशनने दिनांक १४ एप्रिल, २००८ रोजी वा त्यासुमारास सदर रुग्णालय त्यांच्याकडे वर्ग करुन घेऊन त्याचे आधुनिकीकरण करुन ५०० खाटांचे रुग्णालय उभारण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ई.एस.आय.सी. च्या कामगार रुग्णालयांना सर्वात जास्त महसूल राज्यातील कामगारांकडून मिळत असताना देखील तसेच अंधेरीच्या कामगार रुग्णालयाला आतापर्यंत कोट्यवधी रुपये देखभाल दुरुस्ती आणि वैद्यकीय साहित्यासाठी देण्यात येऊनही राज्यातील कामगारांना ब्लड बँक, पॅथलॉजी सेवा आणि हृदय शस्त्रक्रियांसारख्या अत्याधुनिक आणि आवश्यक सोयी – सुविधा उपलब्ध होत नसल्याची बाब दिनांक १५ जानेवारी, २०२३ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय;

(३) असल्यास, सदर रुग्णालयात दिनांक १७ डिसेंबर, २०१८ रोजी वा त्यासुमारास आगीची दुर्घटना घडून १३ जणांचा मृत्यू होऊन १५० जण जखमी झाले होते, तथापि, आगीची दुर्घटना घडल्यामुळे गेल्या चार वर्षांपासून हे रुग्णालय बंद असून अंधेरीच्या कामगार रुग्णालयाला फायर व अन्य आवश्यक प्रमाणपत्रे मिळाली नसून हजारो कामगारांना कांदिवलीच्या कामगार रुग्णालयामध्ये उपचारासाठी जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर रुग्णालयातील २५० डॉक्टर व ५०० वैद्यकीय कर्मचारी इतरत्र वर्ग करण्यात आले असून सदर कामगार रुग्णालय बंद करुन रुग्णालयाची पाच हजार कोटी रुपये किंमतीची सुमारे १२ एकर जमीन उद्योगपतींना विकण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, या कामगार रुग्णालयाची मालमत्ता आणि जमिनीची किंमत हजारो कोटी रुपये असतानाही हे रूग्णालय बंद असल्याने उपचाराकरिता आजारी कामगारांची व त्यांच्यावर अवलंबून असणाऱ्या कुटुंबीयांची मोठ्या प्रमाणात गैरसोय होत असून, हे बंद असलेले कामगार रूग्णालय त्वरित सुरू करण्याबाबत कामगार संघटनानी तसेच सामाजिक संघटनेने माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान राज्य शासनास लेखी निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने अंधेरीच्या कामगार रुग्णालयाला आतापर्यंत कोट्यवधी रुपये देखभाल दुरुस्ती आणि वैद्यकीय साहित्यासाठी देण्यात येऊनही अंधेरीतील बंद असलेले कामगार राज्य विमा रुग्णालय पुन्हा सुरु करुन कामगारांना आरोग्यसेवा देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) होय, हे खरे आहे.

केंद्र शासनाच्या "राज्य कामगार विमा अधिनियम १९४८" अन्वये श्रम व रोजगार मंत्रालय, भारत सरकार यांच्या अधिपत्याखालील राज्य कामगार विमा महामंडळ, नवी दिल्ली यांच्या मार्फत "राज्य कामगार विमा योजना" राबविली जात असून सदर योजनेंतर्गत नोंदणीकृत विमाधारक व लाभार्थींना राज्य शासनामार्फत वैद्यकीय सेवा पुरविण्यात येते.

केंद्र शासनाच्या अधिपत्याखालील राज्य कामगार विमा महामंडळाने प्रत्येक राज्यात एक आदर्श रूग्णालय चालविण्याचे धोरण स्वीकारून सन २००८ पर्यंत राज्य शासनामार्फत चालविण्यात येणारे राज्य कामगार विमा रूग्णालय, अंधेरी हे राकावि महामंडळास आदर्श रूग्णालय म्हणून चालविण्यासाठी हस्तांतरीत करावे असे राज्य कामगार विमा महामंडळाने प्रस्तावित केले होते. त्यानुसार राज्य शासनाने सन २००८ मध्ये राकावि महामंडळास सदर रूग्णालय हस्तांतरीत केले असून त्यानंतर राकावि महामंडळामार्फत सदर रूग्णालयाचे आधुनिकीकरण करुन चालविण्यात येत आहे.
(२) होय, हे खरे आहे.

सदर रूग्णालयास दिनांक १७ डिसेंबर, २०१८ रोजी आग लागून झालेल्या दुर्घटनेत १४ व्यक्तींचा मृत्यू व १४९ व्यक्ती जखमी झाले होते. सदर दुर्घटनेनंतर सदर रूग्णालयाची इमारत ही दुरूस्ती व नुतनीकरणाकरिता बंद ठेवण्यात आली आहे. सदरहू रुग्णालय तातडीने सुरु करण्याबाबत मानद सचिव, महाराष्ट्र प्रदेश कॉग्रेस कमिटी, मुंबई यांनी केंद्र शासनास दिनांक ५ जानेवारी, २०२३ रोजी निवेदन दिले असून केंद्र शासनाच्या अधिपत्याखालील रा.का.वि.महामंडळाकडून पुढील कार्यवाही सुरु आहे.
(३) दिनांक १७ डिसेंबर, २०१८ मध्ये राकावि महामंडळ, अंधेरी रूग्णालयास आग लागल्यानंतर सदर रूग्णालय हे राकावि रूग्णालय, कांदिवली येथे संयुक्तरित्या कार्यरत ठेवण्यात आले आहे व अंधेरीच्या हजारो विमारूग्णांना राकावि रूग्णालय कांदिवली येथून उपचार पुरविण्यात येत आहेत. अंधेरी येथील रुग्णालयास अग्नि सुरक्षेबाबत ना-हरकत प्रमाणपत्र मिळण्यासाठी राज्य कामगार विमा महामंडळाचे संबंधित वास्तुविशारद (Architect) यांच्याकडून महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळाकडे वारंवार पाठपुरावा करण्यात येत आहे. मुख्य अग्निशमन अधिकारी यांनी दिनांक २४/०१/२०२३ रोजी स्थळ पाहणी केली व त्यांनी सदर रुग्णालयाच्या बाह्य रुग्ण विभागाची इमारत कार्यरत करण्यास हरकत नसल्याचे नमूद केले आहे.

(४) सदर रूग्णालयातील केंद्र शासनाच्या अधिपत्याखालील राकावि महामंडळाचे डॉक्टर व इतर कर्मचाऱ्यांना राकावियो रूग्णालय, कांदिवली येथे स्थानांतरीत करण्यात आले आहे. सदरहू रुग्णालयाच्या जमिनीच्या विक्रीबाबतची बाब शासनाच्या निदर्शनास आलेली नाही.
(५) सदरहू रुग्णालय तातडीने सुरु करण्याबाबत मानद सचिव, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी, मुंबई यांनी केंद्रशासनास दिनांक ५ जानेवारी, २०२३ रोजी निवेदन दिले असून सदर विषय हा केंद्र शासनाच्या अधिपत्याखालील रा.का.वि. महामंडळाशी संबंधित असल्याने रा.का.वि.महामंडळाकडे पुढील कार्यवाही साठी पाठविण्यात आले आहे.
(६) केंद्र शासनाच्या अधिपत्याखालील राकावि महामंडळ यांच्याकडून सदर अंधेरी येथील रुग्णालयास महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळाकडून अग्नि सुरक्षेबाबत ना-हरकत प्रमाणपत्र प्राप्त झाले नंतर त्यांचेमार्फत पुढील कार्यवाही प्रस्तावित आहे.

-----------------

## रायगड व जळगाव जिल्ह्यातील क्रीडा संकुल उभारणीसाठी जागा उपलब्ध करुन देण्याबाबत

**(२०) * १७९५९ श्री.अनिकेत तटकरे, श्री.शशिकांत शिंदे, श्री.सतिश चव्हाण, श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **क्रीडा व युवक कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात राष्ट्रीय आणि आंतराष्ट्रीय दर्जाच्या क्रीडा सुविधा उपलब्ध व्हाव्यात यासाठी त्रिस्तरीय क्रीडा संकुलांची उभारणी करण्याचे धोरण राज्य शासनाने स्वीकारले असून यात विभागीय स्तर, जिल्हास्तर आणि तालुकास्तरीय क्रीडा संकुलांचा समावेश असून रायगड जिल्ह्यातील १५ तालुक्यांपैकी ६ तालुक्यांमध्ये तालुका क्रीडा संकुल उभारणीची कामे प्रलंबित असल्याची बाब माहे डिसेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, रायगड जिल्ह्यातील सदर ६ क्रीडा संकुल उभारणीची कामे प्रलंबित असलेल्या तालुक्यांपैकी ३ तालुक्यात क्रीडा संकुलासाठी जागाच अद्याप उपलब्ध होऊ शकलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, बोदवड(जि.जळगाव) येथील नगरपंचायतींतर्गत तालुका क्रीडा संकुल मंजूर असून जागे अभावी बांधकाम झालेले नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, 'तालुका तिथे क्रीडा संकुल' या शासनाच्या धोरणाची अंमलबजावणी प्रभावीपणे होत नसून आजही अनेक तालुक्यांमध्ये क्रीडा संकुलांची कामे सुरु होऊ शकलेली नसल्यामुळे सदर भागातील होतकरू मुलांना खेळात नैपुण्य प्राप्त करण्याच्या संधी उपलब्ध होत नसल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, काही ठिकाणी कंत्राटदारांच्या संथ गतीने होणाऱ्या कामांमुळे क्रीडा संकुलांच्या उभारणीच्या कामाला विलंब होत आहे, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने राज्यातील रायगड, जळगांव जिल्ह्यांसह इतर जिल्ह्यातील क्रीडा संकुले विशिष्ट कालमर्यादेत पूर्ण करण्यावर भर देण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही अथवा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

रायगड जिल्ह्यातील १५ तालुका क्रीडा संकुलांपैकी ८ तालुका क्रीडा संकुलांची कामे पूर्ण झाली असून, महाड, कर्जत व खालापूर या ३ तालुका क्रीडा संकुलांची कामे प्रगतीपथावर आहेत. उर्वरित उरण, मुरुड, अलिबाग व पोलादपूर या ४ प्रलंबित तालुका क्रीडा संकुलांपैकी उरण तालुका क्रीडा संकुलासाठी सिडकोकडून जागा उपलब्ध करून घेण्याची कार्यवाही सुरू आहे. तसेच मुरुड, अलिबाग व पोलादपूर या ३ तालुक्यातील क्रीडा संकुलांसाठी महसूल विभागाकडे जागेची मागणी करण्यात आली आहे.

(३) होय.

(४) हे खरे नाही.

क्रीडा संकुलांसाठी सुयोग्य जागा उपलब्ध करण्यासाठी संबंधित महसूली विभाग, स्थानिक स्वराज्य संस्था, प्राधिकरणे यांचेकडे पाठपुरावा करण्यात येत आहे.

ग्रामीण तसेच शहरी भागातील होतकरु मुलांना खेळात नैपुण्य प्राप्त व्हावे यासाठी शालेय स्तरावर, विद्यापीठ स्तरावर, राज्य स्तरावर विविध क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात येऊन, निवडलेल्या प्रतिभावंत खेळाडूंना निवासी/अनिवासी क्रीडा प्रबोधिनी, जिल्हा क्रीडा प्रशिक्षण केंद्रे यांच्या माध्यमातून क्रीडा प्रशिक्षण, क्रीडा साहित्य, स्पर्धा सहभागाकरिता शासनाकडून आर्थिक सहाय्य करण्यात येते.

(५) हे खरे नाही.

(६) प्रलंबित तालुका क्रीडा संकुलांपैकी बहुतांश संकुलांची कामे सुयोग्य जागा उपलब्ध होत नसल्यामुळे प्रलंबित राहिलेली आहेत. तर काही संकुलांची कामे संबंधित जागेचे प्रकरण न्यायप्रविष्ट असल्यामुळे प्रलंबित राहिली आहेत.

-----------------

## सांगली जिल्हा परिषदेमार्फत ग्रामीण भागात लावलेले सौर उर्जेचे दिवे बंद असल्याबाबत

**(२१) * १७९९२ श्री.अरुण लाड :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली जिल्हा परिषदेमार्फत वीजेची बचत व भारनियमनावर मात करण्याकरिता सौर ऊर्जेचे दिवे ग्रामीण भागात लावण्यात आले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ग्रामीण भागात लावण्यात आलेले बहुतांश विजेचे दिवे बंद असून काही दिव्यांची स्थिती अत्यंत दयनीय झाली आहे तर सौर दिव्याच्या बॅटऱ्या दुरुस्तीच्या नावाखाली संबंधित ठेकेदाराने हस्तगत केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने संबंधित ठेकेदारावर कारवाई करण्याबाबत तसेच सदर महत्वपूर्ण योजना सांगली जिल्ह्यांसह राज्यातील इतर जिल्ह्यात पुन्हा नव्याने सुरु करण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) सांगली जिल्हा परिषदेकडून सन २०११-२०१२, २०१२-२०१३ व सन २०१३-२०१४ या आर्थिक वर्षात सौर पथ दिवे खरेदी करुन ग्रामपंचायतींना पुरवठा करण्यात आला होता.सांगली जिल्ह्यामध्ये एकूण ३३०० सौर पथ दिव्यांचे वाटप झालेले होते. त्यापैकी सर्व ३३०० सौर पथ दिवे सध्या बंद स्थितीत आहेत. सदर सौर दिव्यांचा देखभाल दुरुस्ती कालावधी ५ वर्षांचा होता तो संपला आहे. ठेकेदाराने बॅटऱ्या हस्तगत केल्याची बाब निदर्शनास आलेली नाही.

देखभाल दुरुस्तीचा हमी कालावधी पूर्ण झाल्याने ठेकेदारावर कारवाईचा प्रश्न उद्‌भवत नाही.

तसेच संबंधित योजना सांगली जिल्ह्यासह इतर जिल्ह्यात पुन्हा नव्याने सुरु करण्याबाबतचे निश्चित धोरण अद्याप नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाची स्थापना करण्याबाबत

**(२२)** * **१८०३२ श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य कामगार विभागांतर्गत चालविल्या जाणाऱ्या इमारत व इतर बांधकाम कल्याणकारी मंडळ सन २०२१ पासून बरखास्त करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर इमारत व इतर बांधकाम कल्याणकारी मंडळावर मंत्रालयीन स्तरावर सदस्यांची नियुक्ती व कामाची जबाबदारी तसेच इमारत बांधकाम कामगारांना सदर योजनेमार्फत मिळणाऱ्या लाभाबाबत तसेच योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीबाबत मंडळ अस्तित्वात नसल्याने अनेक निर्णय लांबणीवर जात असून बरखास्त करण्यात आलेले इमारत व इतर बांधकाम कल्याणकारी मंडळ पुन्हा स्थापन करण्याची मागणी कामगारांनी दिनांक ११ जानेवारी, २०२३ रोजी वा त्या सुमारास लेखी निवेदनाद्वारे मा.मुख्यमंत्री, मा.कामगार मंत्री, तसेच प्रधान सचिव, कामगार विभाग यांच्याकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने बरखास्त झालेली राज्य कामगार विभागांतर्गत चालविली जाणारी इमारत व इतर बांधकाम कल्याणकारी मंडळ पुन्हा स्थापन करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. सुरेश (भाऊ) खाडे :** (१) हे खरे नाही.

इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार विनियमन व सेवाशर्ती) अधिनियम, १९९६ च्या कलम १८ अन्वये शासनाच्या दिनांक ३०/०६/२०१८ रोजीच्या अधिसूचनेन्वये त्रिपक्षीय मंडळाची स्थापना करण्यात आली. महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार नियमन व सेवाशर्ती) नियम, २००७ च्या नियम ३५ अन्वये सदस्यांचा कार्यकाळ तीन वर्ष निश्चित केला असल्याने सदर कालावधी दिनांक ३०/०६/२०२१ रोजी संपुष्टात आला आहे.

(२) महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ गठित करणेबाबतच्या विषयी दिनांक ११ जानेवारी, २०२३ रोजीचे निवेदन शासनास प्राप्त झाले, हे खरे आहे.

(३) महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाचा कालावधी दिनांक ३०/०६/२०२१ रोजी संपुष्टात आला असून मंडळाचे पुन:र्गठण करण्याची कार्यवाही शासनाच्या विचाराधीन आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## खरिवली तर्फे कोहोज (ता.वाडा, जि.पालघर) येथील ग्रामपंचायतीच्या मालकीच्या जागेवर स्मशानभूमी बांधण्याबाबत

**(२३)** * **१८३४४ श्री.राजहंस सिंह :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) खरिवली तर्फे कोहोज (ता.वाडा, जि.पालघर) गावात ग्रामपंचायतीच्या मालकीची जागा स्मशानभूमीसाठी राखीव असतानाही सदर जागेवर व्यावसायिकांनी अतिक्रमण केल्याची बाब ग्रामस्थांच्या निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गावातील सार्वजनिक वापरासाठी असलेल्या शासकीय जमिनीवर स्मशानभूमी बांधण्यासाठी संबंधित गावाच्या वहिवाटेचे हक्क व अधिकार असतात अशा शासकीय जमिनी ग्रामपंचायतीकडे निहित (Vest) केलेल्या असतात, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, वाडा तालुक्यातील खरिवली तर्फे कोहोज या ग्रामपंचायतीकडे सर्वे नंबर ३७ हा शासनाने १९५७ साली स्मशानभूमीसाठी वर्ग करुनही मागील ६६ वर्षात या जागी स्मशानभूमी बांधण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने वाडा तालुक्यातील खरिवली तर्फे कोहोज या ग्रामपंचायतीकडे सर्वे नंबर ३७ या स्मशानभूमीसाठी राखीव ठेवण्यात आलेल्या शासकीय भूखंडावर अनेक वर्षापासून प्रलंबित असलेले स्मशानभूमी बांधण्याचे काम तात्काळ सुरु करावे यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन :** (१) नाही, हे खरे नाही.
(२) होय, हे खरे आहे.
(३) व (४) होय हे खरे आहे.

खरिवली तर्फे कोहोज गावाकरिता स्मशानभूमीची व्यवस्था असल्याने व गावाची लोकसंख्या विचारात घेता एका गावासाठी दोन स्मशानभूमीची आवश्यकता वाटत नसल्याने स्मशानभूमीसाठी राखीव असलेल्या सर्वे नं. ३७ मध्ये नव्याने स्मशानभूमी बांधणेबाबतचा प्रस्ताव पंचायतीने सादर केलेला नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## साबळेवाडी (ता.खेड, जि.पुणे) येथील श्री आंबिका देवस्थानाला ‘क’ वर्गाचा दर्जा मिळण्याबाबत

**(२४) * १७२५३ श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, अॅड.निरंजन डावखरे, श्री.रमेशदादा पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक १५२२६ ला दिनांक १९ डिसेंबर, २०२२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे साबळेवाडी (ता.खेड, जि.पुणे) येथे श्री अंबिका देवस्थान मंदिर पुरातत्व काळापासून अस्तित्वात असून लोकप्रतिनिधी व ग्रामस्थ यांनी वर्गणीद्वारे निधी जमा करुन देवस्थानाचा जीर्णोद्धार केला आहे, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, मौजे साबळेवाडी (ता.खेड, जि.पुणे) येथे श्रीअंबिका देवस्थान मंदिर ट्रस्टमार्फत जिल्हा परिषदेस प्राप्त झालेला प्रस्ताव अपूर्ण असून कागदपत्रांची पुर्तता करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरील देवस्थानाने योग्य त्या कागदपत्रांची पुर्तता करून मा.मुख्य कार्यकारी अभियंता, जि.प. पुणे यांच्याकडे परिपूर्ण प्रस्ताव दिनांक ९ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास सादर केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने श्री आंबिका देवस्थान तीर्थक्षेत्रास तातडीने “क” वर्ग दर्जा देण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन :** (१) होय, हे खरे आहे.

(२), (३) व (४) हे खरे नाही. प्राप्त प्रस्ताव अपूर्ण आहे. संबंधित ट्रस्टने, जिल्हा परिषदेला सादर केलेला प्रस्ताव अपूर्ण असल्यामुळे त्यांच्यामार्फत कागदपत्रांची पूर्तता करण्यात येत आहे. कागदपत्रांची पूर्तता झाल्यानंतर तीर्थक्षेत्राला “क” वर्ग दर्जा देण्याचा प्रस्ताव जिल्हा नियोजन समितीपुढे मान्यतेसाठी सादर करण्यात येईल.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागण्यांबाबत

**(२५) * १७१८१ श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.अमोल मिटकरी, श्री.गोपिचंद पडळकर, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सुमारे २७००० ग्रामपंचायतींमध्ये एक लाख ४० हजारांहून अधिक ग्रामपंचायत कर्मचारी गत अनेक वर्षापासून अत्यंत अल्प वेतनावर सेवा बजावत असून मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ मधील कलम ६१ नुसार कर्मचाऱ्यांचे वेतन ग्रामनिधीतून देण्याची तरतूद रद्द करावी, ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांना महानगरपालिका, नगरपालिका, नगरपरिषद, नगरपंचायत या स्थानिक स्वराज्य संस्थेतील कर्मचाऱ्यांप्रमाणे

शंभर टक्के वेतन शासनाकडून मिळावे, वसुलीची अट रद्द करावी, नवीन दराप्रमाणे किमान वेतन फरकासह मिळावे इत्यादी स्वरुपांच्या मागण्या महाराष्ट्र राज्य ग्रामपंचायत कर्मचारी संघाने राज्याचे मा.उपमुख्यमंत्री यांना माहे सप्टेंबर, २०२२ च्या सुमारास निवेदनाद्वारे केल्या होत्या, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील सुमारे ६० हजार ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांना सध्याचे किमान वेतन मिळत नसल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले असून सदर कर्मचाऱ्यांना ग्रामपंचायतीच्या विविध करांची वसूली, उत्पन्नाचा निकष लावल्याने या कर्मचाऱ्यांना केवळ २ ते ५ हजार वेतन मिळत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील २७ हजार ९२० ग्रामपंचायतीत काम करीत असलेल्या सुमारे ६० हजार कर्मचाऱ्यांचा गत २१ वर्षांपासून किमान वेतन मिळत नसल्याने सन २००० च्या शासन निर्णयाप्रमाणे लोकसंख्या व उत्पन्नानुसार वाढीव अनुदान देण्याबाबतचा निर्णय घेण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्यातील ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांनी वेतनश्रेणी, सुधारित किमान वेतन लागू करणे, निवृतीवेतन लागू करणे इत्यादी मागण्यांसाठी आंदोलन, निवेदन यांच्या माध्यमातून सातत्याने शासनाकडे पाठपुरावा केला आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, वित्त विभागाच्या मान्यतेनंतर सुधारित किमान वेतनाच्या अनुषंगाने अर्थसंकल्पीय तरतुदीबाबत कार्यवाही करण्याबाबत शासन स्तरावरुन सूचना देण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर कर्मचाऱ्यांना ग्रामपंचायतीच्या विविध करांची वसूली, उत्पन्नाचा निकष न लावता सध्याचे किमान वेतन लागू करण्याबाबत तसेच सदर कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागण्या पूर्ण करण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

(२) नाही, हे खरे नाही.

(३) ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांना दिनांक ०१/०४/२०२२ पासून दरमहा सुधारित किमान वेतन अनुज्ञेय केले आहे.

(४) होय, हे खरे आहे.

(५) होय, हे खरे आहे.

(६) ग्रामपंचायत कर्मचारी हा शासनाचा कर्मचारी नसून महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, १९५९ मधील कलम ६१ नुसार संबंधित ग्रामपंचायत कर्मचारी असतो. तथापि, बहुसंख्य ग्रामपंचायती आर्थिकदृष्ट्या सक्षम नसल्यामुळे शासनाकडून ग्रामपंचायतीच्या कर्मचाऱ्यांसाठी ग्रामपंचायतींना विविध करांची वसुली करण्याच्या अटीस अधीन राहून, त्यांना किमान वेतन लागू करण्याबाबत धोरणात्मक निर्णय घेतला असून दिनांक ०१/०४/२०२२ पासून किमान वेतन लागू करण्यात आले आहे.

-----------------

## रायगड जिल्ह्यातील पर्यटन स्थळांच्या विकासाबाबत

**(२६)** * **१६९८९ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्ह्यातील पर्यटन स्थळांवर पर्यटक मोठ्या संख्येने येत असून जिल्ह्यातील समुद्रकिनारी, धबधबे, गडकिल्ले धार्मिक स्थळे, धरणे यांसह इतर पर्यटन स्थळांना मोठ्या संख्येने पर्यटक भेटी देत असून सदर पर्यटन स्थळांच्या विकासाकडे प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्यामुळे पर्यटकांना विविध सोयी सुविधांपासून वंचित रहावे लागत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, रायगड जिल्ह्यातील पर्यटन स्थळांवरील पोहण्याच्या ठिकाणी संरक्षक जाळी नसणे, लाइफ गार्डची कमतरता तसेच धोक्याची सूचना देणारे सायरनची कमतरता, अपुरी प्रकाश व्यवस्था तसेच सुरक्षा व्यवस्थेचा उडालेला बोजवारा या साऱ्या बाबींसह इतर सोयी सुविधांची कमतरता मोठ्या प्रमाणात उद्‌भवत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, रायगड जिल्ह्यातील २० पेक्षा अधिक समुद्रकिनाऱ्यांवर पर्यटकांची मोठ्या प्रमाणात गर्दी होत असून केवळ पाच समुद्रकिनाऱ्यांवरच लाइफ गार्ड तैनात असतात तर तीन समुद्रकिनाऱ्यावर पोहण्याच्या ठिकाणी संरक्षण जाळी आहेत, ६० पर्यटन स्थळांपैकी दोन पर्यटन स्थळांवर धोक्याची सूचना देणारे सायरन आहेत, केवळ तीन पर्यटन स्थळांवर पोलीस चौकी आहेत, धोक्याची सूचना देणारे फलक तेरा पर्यटन स्थळांवर बसवण्यात आले असून उर्वरित पंधरा पर्यटन स्थळांवर रात्री प्रकाशव्यवस्था नसल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केले आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने रायगड जिल्ह्यातील पर्यटन स्थळांचा विकास करुन पर्यटन व्यवसायाला चालना मिळावी तसेच पर्यटकांच्या सुरक्षिततेबाबत काळजी घेतली जावी यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही अथवा उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.मंगलप्रभात लोढा :** (१) नाही.

(२) नाही.

(३) व (४) रायगड जिल्ह्यातील मांडवा, अलिबाग, आक्शी, नागाव, मुरुड-एकदरा, मुरुड-जंजिरा जलदुर्ग, काशीद, श्रीवर्धन, हरिहरेश्वर, दिवे-आगार आणि किहिम या समुद्रकिनाऱ्यावरती रुपये ३९.४९ लक्ष तसेच, सासवणे, आवास, थळ (खांदेरी-उंदेरी किल्ला), वरसोली, रेवदंडा, कोर्लई, रांजणपाडा डावली, मिळकतखार, कोप्रोली-बोडणी, आदगाव, वेळास आगार, घारापुरी आणि नागाव-पिरवाडी या समुद्र किनाऱ्यावर रुपये ३८.५७ लक्ष अशा २४ समुद्र किनाऱ्यावर पर्यटकांच्या सुरक्षाव्यवस्थेसाठी एकूण रुपये ७८.०६ लक्ष इतका निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

मांडवा, किहिम, आक्शी, नागाव, रेवदंडा, कोर्लई, काशिद व हरिहरेश्वर या ८ समुद्रकिनाऱ्यावरती रेस्क्यु ट्रयुब, रेस्क्यु कॅन, सर्फ रेस्क्यु बोर्ड, वॉकी-टॉकी सेट, थ्रो बॅग, लाईफ गार्ड, युनिफॉर्म इत्यादीकरिता रुपये ८.६८ लक्ष निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

रायगड जिल्ह्यातील पर्यटन स्थळांच्या ठिकाणी तसेच समुद्रकिनाऱ्याच्या ठिकाणी संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांमार्फत सुरक्षा विषयक व इतर उपाययोजना करण्यात आल्या आहेत.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

----------------

**बोईसर (जि.पालघर) येथे ग्रामीण रुग्णालय उभारणीसाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(२७) * १७५४० ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्री.रमेशदादा पाटील, श्री.शशिकांत शिंदे, श्री.अमोल मिटकरी, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) संजय नगर बोईसर (जि.पालघर) येथील नागरिकांसाठी ३० खाटांचे ग्रामीण रुग्णालय मंजूर झाले असूनही रुग्णालय उभारणीसाठी शासनाकडून निधी मिळत नसल्याने गत दोन वर्षापासून रुग्णालयाचे बांधकामास सुरुवात झाली नसल्याचे माहे डिसेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, २० कोटींचा प्रस्ताव गत दोन वर्षांपासून शासनाकडे प्रलंबित असून आरोग्य सुविधा मिळत नसल्याने बोईसर येथील नागरिकांना अडचणींचा सामना करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर ३० खाटांच्या ग्रामीण रुग्णालय नवीन इमारतीसाठी दीड एकर शासकीय जागा आरक्षित करुन शासनाने त्या कामास तीन वर्षांपूर्वी मंजुरी देखील दिलेली होती, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, अद्याप निधी दिलेला नसल्यामुळे रुग्णालयाचे काम प्रलंबित असून त्या परिसरातील गोरगरीबांना उपचारासाठी खासगी रुग्णालयात अथवा पालघर, मुंबई अन्यथा गुजरात हद्दीतील शासकीय रुग्णालयात जाऊन औषधोपचार करावे लागत असल्याचे दिनांक ७ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने सदर रुग्णालयाच्या बांधकामास तात्काळ निधी उपलब्ध करून देऊन अद्ययावत ग्रामीण रुग्णालय सुरू करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

ग्रामीण रुग्णालय, बोईसरचे कामकाज डिसेंबर, २०२१ पासून तारापूर औद्योगिक उत्पादक संस्थेचे नियंत्रणाखाली असलेल्या टिमा रुग्णालयाच्या इमारतीत कार्यरत करण्यात आले असून, परिसरातील रुग्णांना आरोग्य सेवा देण्यात येत आहेत.

(३) हे अंशत: खरे आहे,

ग्रामीण रुग्णालय, बोईसर करिता सरवली ग्रामपंचायत हद्दीतील स.नं.१०४/१/अ क्षेत्र २.२४.० हे. आर पैकी ०.६०.०० हे. आर जमीन दिनांक १९/०३/२०२१ रोजी जिल्हाधिकारी, पालघर यांनी मंजूर केलेली आहे. जागेचा ७/१२ आरोग्य विभागाचे नावे करण्यात आलेला आहे.

(४) हे खरे नाही.

(५) ग्रामीण रुग्णालय, बोईसर च्या ३० खाटांच्या रुग्णालय बांधकामाचे अंदाजपत्रकास मान्यता देण्याच्या अनुषंगाने सदरचा प्रस्ताव IPHS २०२२ च्या मार्गदर्शक सूचनांनुसार सादर करण्याबाबत आरोग्य सेवा आयुक्तालयास कळविले आहे. सदरहू अंदाजपत्रक व आराखडे IPHS २०२२ च्या मार्गदर्शक सूचनांनुसार तपासून सादर करण्याची कार्यवाही आरोग्य सेवा आयुक्तालय स्तरावर सुरु आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## परभणी जिल्हा रुग्णालयांस औषधे व सर्जिकल साहित्य उपलब्ध करुन देण्याबाबत

**(२८) * १७१०७ श्री.सतिश चव्हाण, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी येथील जिल्हा सामान्य रुग्णालयात प्रतिदिन किमान १८०० ते २००० रुग्णांची (ओपीडी) बाहय रुग्ण तपासणी करण्यात येते, परभणी स्त्री रुग्णालयात गर्भवती महिलांची प्रतिदिवस किमान २०० ते २५० बाह्य रुग्णांची तपासणी करण्यात येते तर वर्षात सुमारे ८००० महिलांची यशस्वीरीत्या प्रसुती केली जाते, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, परभणी येथील जिल्हा सामान्य रुग्णालयात रुग्णालयास वर्षाला लागणाऱ्या औषधे, सर्जिकल साहित्यांपैकी ७५ टक्के साहित्य राज्य शासनाकडून पुरविले जाते तर २५ टक्के औषधांची स्थानिक पातळीवर खरेदी केली जाते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर रूग्णालयास शासनाकडून औषधी व सर्जिकल साहित्य यांचा अनियमित पुरवठा होत असून सर्वसामान्य गोरगरीब रुग्णांना बाहेरुन औषध खरेदी करावी लागते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, परभणी सामान्य रुग्णालयामार्फत सन २०२२-२३ करिता रुपये ७५ कोटीं पर्यंतच्या औषधांची मागणी शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने परभणी जिल्हा रुग्णालयाच्या मागणीप्रमाणे तात्काळ औषधे, सर्जिकल साहित्य उपलब्ध करुन देण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) हे खरे आहे.

(२) जिल्हा नियोजन समिती मार्फत दिल्या जाणाऱ्या निधीतून जिल्हयांना १०० टक्के निधी खर्चास मान्यता देण्यात आलेली आहे. तसेच औषधी व साहित्य सामुग्री व उपकरणे साठी राज्य स्तरावरील निधीतून १० टक्के निधी स्थानिक स्तरावर खरेदीसाठी वितरीत केला जातो. तसेच गरजेनुसार रुग्ण कल्याण निधीतून औषधे व साहित्य सामुग्री खरेदीसाठी जिल्हयांना परवानगी देण्यात आलेली आहे.

(३) हे खरे नाही.

(४) हे अंशत: खरे आहे. जिल्हा शल्यचिकित्सक, परभणी यांनी सन २०२२-२३ या आर्थिक वर्षासाठी लागणारी औषधी, कंझ्युमेबल्स, प्रयोगशाळा साहित्य,छोटी हत्यारे, सर्जिकल्स इ.बाबींची वार्षिक मागणी ई-औषधी प्रणालीवर अंदाजित रुपये ६५.७६ कोटी एवढया रकमेची मागणी नोंदविली आहे.

(५) राज्यातील आरोग्य संस्थांकडून ई-औषधी प्रणालीवर नोंदविलेली औषधी व साहित्य सामुग्री या बाबींची वार्षिक मागणी व सन २०२२-२३ या वित्तीय वर्षासाठी उपलब्ध अनुदानाच्या मर्यादेत अत्यावश्यक असलेल्या औषधांची खरेदी करण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.

-----------------

## राज्यातील विशेषत: ठाणे जिल्ह्यातील भिवंडीमध्ये सुरक्षित मातृत्वासाठीच्या शासकीय योजनांचा प्रसार करण्याबाबत

**(२९) * १७०२६ डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील तसेच ठाणे जिल्ह्यातील भिवंडीमध्ये (जि.ठाणे) हजारो महिलांच्या प्रसुती आजही घरीच केल्या जात असल्याची बाब दिनांक ५ जानेवारी, २०२३ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, माहे एप्रिल, २०२२ ते माहे नोव्हेंबर, २०२२ अखेर ठाणे जिल्ह्यात १२१३, पालघर मध्ये १३० आणि रायगड मध्ये ४१ प्रसुती घरांमध्येच करण्यात आल्याची शासकीय नोंद असल्याने त्या परिसरात काम करणाऱ्या आरोग्य यंत्रणेबाबत संभ्रम निर्माण होत आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, 'सुरक्षित मातृत्व आणि वैद्यकीय केंद्रातच प्रसूती' तसेच महिला आणि बालआरोग्याच्या क्षेत्रातील कामगिरी यानुषंगाने राज्यातील तसेच भिवंडी (जि.ठाणे) येथील नवजात बालक व अर्भक यांच्या सुरक्षिततेसाठी लागू करण्यात आलेल्या शासकीय योजनांचा प्रचार व प्रसार होण्याच्यादृष्टीने शासनाने कोणत्या उपायोजना केल्या आहेत,
(४) असल्यास, सुरक्षित मातृत्वासाठी लागू करण्यात आलेल्या शासकीय योजना समाजाच्या शेवटच्या टोकापर्यंत पोहोचविण्याच्या दृष्टीने तसेच गर्भवतीची, अर्भकाची स्थिती कशी आहे याच्या वेळोवेळी तपासण्या आरोग्य विभागाकडून करण्यात येऊन बालमृत्यू आणि मातामृत्यू रोखण्याकरिता प्रशासकीय स्तरावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) हे अंशतः खरे आहे.

केंद्र शासनाच्या IHIP HMIS पोर्टलच्या अहवालानुसार माहे एप्रिल, २०२२ ते माहे नोव्हेंबर, २०२२ अखेर राज्यात घरी झालेल्या प्रसूतींची संख्या ५२५४ इतकी असून भिवंडी महानगरपालिका कार्यक्षेत्रात १०७२ प्रसूती घरी झालेल्या आहेत.
(२) हे खरे नाही.

IHIP HMIS पोर्टलनुसार माहे एप्रिल, २०२२ ते माहे नोव्हेंबर, २०२२ मध्ये ठाणे, पालघर व रायगड या जिल्हयांमध्ये अनुक्रमे ११९९, १२४ व ३८ प्रसुती घरी झालेल्या आहेत
(३) योजनांच्या सुयोग्य अंमलबजावणीसाठी या योजनांबाबत व्यापक जनजागृती तसेच लाभार्थींचे समुपदेशन करण्यात येते.
(४) केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनानुसार मातामृत्यू व बालमृत्यू रोखण्याबाबत खालील उपाययोजना करण्यात येतात.

- गरोदरपणामध्ये १२ आठवड्याच्या आत नोंदणी व गरोदरपणा दरम्यान किमान ४ वेळा तपासणी, करण्यात येते.
- ॲनिमिया मुक्त भारत कार्यक्रमाअतर्गत सर्व गरोदर तथा स्तनदा मातांना प्रसूती पुर्व व प्रसूती पश्चात सहा महिने लोहयुक्त गोळया देण्यात येतात. सर्व प्रजननक्षम मातांना आठवड्याला एक याप्रमाणे वर्षाला ५२ लोहयुक्त गोळया देण्यात येतात. तसेच सर्व वयोगटातील मातांना जंतनाशक औषध देण्यात येते.
- प्रसूती च्या दिनांकाच्या एक महिना अगोदरपासून संस्थात्मक प्रसूती होण्यासाठी आरोग्य यंत्रणेमार्फत पाठपुरावा करण्यात येतो.

- प्रसूती पुर्व तपासणीच्या वेळी अतिजोखमीच्या माता ओळखून त्यांच्या यादया सर्व संस्थास्तरावर बनवून संनियंत्रण करण्यात येतात.
- तीव्र रक्तक्षय असलेल्या गरोदर मातांच्या यादया बनविण्यात येतात व त्यांना प्राथमिक आरोग्य केंद्र व त्यावरील शासकीय संस्थेमध्ये वैद्यकीय अधिकाऱ्याच्या उपस्थितीत शिरेद्वारे इंजे. आयर्न सुक्रोज देण्यात येते. गरोदरपणी हिमोग्लोबीनचे प्रमाण ५ ग्रॅम टक्केपेक्षा कमी आढळल्यास अशा लाभार्थीला रक्त संक्रमण करण्यात येते.
- राज्यात दर महिन्याच्या ९ तारखेला प्रधानमंत्री सुरक्षित मातृत्व अभियान राबविण्यात येते.
- गरोदर मातेच्या नोंदणीच्यावेळी सर्व गरोदर मातांसाठी एका बर्थ कॅपनियनची निवड करण्यात येते. बर्थ कॅपनियनना गरोदरपणातील धोक्याच्या लक्षणाविषयी थोडक्यात माहिती देण्यात येते व अशी लक्षणे संबंधित गरोदर मातेत आढळल्यास त्वरीत नजीकच्या दवाखान्यात मातेस घेऊन येण्याबाबत व उपलब्ध असलेल्या सेवांबाबत माहिती देण्यात येते.
- सर्व गरोदर मातांना संस्थेमध्ये बाळंतपणासाठी प्रवृत्त करण्यात येते.
- बाळंतपणानंतर गरोदर माता किमान ३ दिवस आरोग्य संस्थेमध्ये वास्तव्य करण्याबाबत सूचना देण्यात आलेल्या आहेत, जेणे करुन प्रसूती पश्चात गुंतागुंत, बाळाचे आरोग्य, लसीकरण या बाबींची काळजी घेण्यात येते. त्याच प्रमाणे या ३ दिवसांच्या कालावधीत स्तनपान, मातेचा आहार कुटुंब नियोजनांच्या साधनांबाबत व आरोग्य इ. संबंधी सर्व माहिती मातांना देण्यात येते.
- गरोदर मातांना जननी सुरक्षा योजना, जननी शिशु सुरक्षा कार्यक्रम, प्रधानमंत्री मातृ वंदना योजना, मानव विकास कार्यक्रम व मातृत्व अनुदान योजनेंचे लाभ देण्यात येतात.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील रुग्णालयांतील बोगस फिजिओथेरपिस्टवर कारवाई करण्याबाबत

**(३०) * १७७२७ श्री.राजेश राठोड : तारांकित प्रश्न क्रमांक १६००७ ला दिनांक १९ डिसेंबर, २०२२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात कोणत्याही प्रकारच्या मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदवी नसतानाही शहरातील नामांकित रुग्णालयांमध्ये बोगस फिजिओथेरपिस्ट रुग्णांवर उपचार करीत असल्याचे माहे सप्टेंबर, २०२२ च्या दुसऱ्या सप्ताहात वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राष्ट्रीय,राज्य व जिल्हा पातळीवरील फिजिओथेरपिस्ट संस्थांकडे नोंदणी करणे अनिवार्य असताना अनेक फिजिओथेरपिस्ट नोंदणी न करतांच रुग्णालयांत कार्यरत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आर्थिक बचतीच्या दृष्टीने अनेक रुग्णालयांनी मान्यताप्राप्त विद्यापीठातून पदवी घेतलेले फिजिओथेरपिस्ट नोकरीकरिता ठेवलेले नाहीत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, बोगस फिजिओथेरपीस्ट नियंत्रणाबाबत शासनातर्फे कोणतीही यंत्रणा नसल्याचे निदर्शनास आले आहे काय, यासंदर्भात शासनाने चौकशी करुन राज्यातील बोगस फिजिओथेरपिस्टवर व रुग्णालयावर कारवाई करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली आहे,

(५) असल्यास, महाराष्ट्र राज्य, व्यवसायोपचार व भौतिकोपचार परिषद, मुंबई यांच्याकडून बोगस फिजिओथेरपिस्ट व्यावसायिकांविरुध्द पोलिसांत तक्रार दाखल करण्यात आली आहे काय, त्यानुषंगाने बोगस फिजिओथेरिपिस्टवर पोलिसांमार्फत कारवाई करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, उक्त परिषदेमार्फत बोगस फिजिओथेरपिस्ट व्यावसायीक व बोगस फिजिओथेरपिस्ट शैक्षणिक संस्था यांना नोटीस बजाविण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(७) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन राज्यातील रुग्णालयात आढळून आलेल्या बोगस फिजिओथेरपिस्टवर व रुग्णालयावर तातडीने कारवाई करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन :** (१) अंशत: खरे आहे.

अशा प्रकारची घटना मुंबई शहरातील विक्रोळी परिसरात खाजगी रुग्णालयामध्ये घडल्याचे आढळून आले आहे.
(२) अशी बाब शासनास आढळून आलेली नाही.
(३) अशी बाब शासनास आढळून आलेली नाही.
(४) राज्यात बोगस फिजिओथेरपिस्ट व्यावसायीकांना आळा घालण्यासाठी महाराष्ट्र राज्य व्यवसायोपचार व भौतिकोपचार परिषद, मुंबई यांच्यामार्फत टि.व्हि., रेडीओ तसेच वर्तमानपत्रामध्ये जाहिरात देऊन जनजागृती केली आहे.
(५) होय.
(६) होय, परिषदेमार्फत १९ बोगस फिजिओथेरपिस्ट व्यावसायीक व १३ बोगस फिजिओथेरपिस्ट शैक्षणिक संस्था यांना नोटीस बजावण्यात आल्या आहेत.
(७) राज्यात बोगस फिजिओथेरपिस्ट व्यावसायीकांना आळा घालण्यासाठी महाराष्ट्र राज्य व्यवसायोपचार व भौतिकोपचार परिषद, मुंबई यांच्यामार्फत टि.व्हि., रेडीओ तसेच वर्तमानपत्रामध्ये जाहिरात देऊन जनजागृती केली आहे. याबाबत महाराष्ट्र राज्य व्यवसायोपचार व भौतिकोपचार परिषद, मुंबई यांच्याकडून बोगस फिजिओथेरपिस्ट व्यावसायीकाविरुध्द पोलिसांत तक्रार दाखल करण्यात आली असून त्यांच्यावर पोलिसांमार्फत कारवाई करण्यात येत आहे.

-----------------

## राज्यात मुंबई, ठाणे, पालघर या जिल्ह्यांतील हजारो वीट कामगार मूलभूत अधिकार व अनेक योजनांपासून वंचित असल्याबाबत

**(३१) * १८२९४ श्री.रमेशदादा पाटील, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती उमा खापरे, श्री.निलय नाईक, श्री.रामदास आंबटकर :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात विशेषत: मुंबई, ठाणे, पालघर या जिल्ह्यातील भिवंडी, पालघर, वसई परिसरात हजारो वीट कामगार काम करीत असून त्यांना कामगाराचा दर्जा न दिल्याने मिळणाऱ्या सोयी सुविधा पासून उपेक्षित असल्याची बाब मोह जानेवारी, २०२३ च्या दुसऱ्या आठवड्यात वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वीट बनविण्यासाठी डहाणू, तलासरी, विक्रमगड, जव्हार, मोखाडा या भागातून मोठ्या प्रमाणात वीट कामगार मजूर म्हणून काम करत असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या कामगारांना ओळखपत्र नसल्याने त्यांना मूलभूत अधिकाराबरोबरच अनेक योजनांपासून वंचित राहावे लागते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने राज्यातील हजारो वीट कामगारांना कामगारांचा दर्जा तसेच सोयी सुविधा मिळण्याच्या दृष्टीने तसेच या कामगारांच्या पाल्यांना शिक्षणापासून वंचित राहावे लागू नये यादृष्टीने कोणती कार्यवाही अथवा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. सुरेश (भाऊ) खाडे :** (१) हे खरे नाही.

शासनाच्या दिनांक १८/०८/२०१७ रोजीच्या अधिसूचनेद्वारे कारखाने अधिनियम, १९४८ अंतर्गत समावेश नसलेल्या वीट तयार करणाऱ्या आस्थापनेतील वीटभट्टी कामगारांना महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळामध्ये नोदंणी करण्याकरिता पात्र ठरविण्यात आलेले आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) व (४) महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळात ठाणे जिल्ह्यातील भिवंडी तालुक्यात ३७४ व पालघर जिल्ह्यात १,८९७ वीटभट्टी कामगारांची नोंदणी झालेली असून त्यांना मंडळाचे ओळखपत्र देण्यात आले आहे. तसेच अन्य वीटभट्टी कामगारांच्या नोंदणीची कार्यवाही सुरु आहे.

ठाणे व पालघर जिल्ह्यातील वीटभट्टी कामगारांना शैक्षणिक अर्थसहाय्य योजना, अत्यावश्यक संच व सुरक्षा संच वाटप, अवजारे खरेदीसाठी अर्थसहाय्य तसेच मध्यान्ह भोजन व रात्रीचे भोजन वाटप या योजनांतर्गत लाभ देण्यात आलेले आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सिरसम बु. (ता.जि.हिंगोली) येथील प्राथमिक आरोग्य केंद्रातील रिक्त पदे भरण्याबाबत

**(३२) * १७७५३ डॉ.प्रज्ञा सातव :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिरसम बु. (ता.जि.हिंगोली) येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात गत १६ वर्षांपासून आरोग्य सहाय्यकासह इतर ६ कर्मचाऱ्यांची पदे रिक्त असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बाबीचा आरोग्य सेवेवर परिणाम होत असून सिरसम बु (ता.जि.हिंगोली) येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात उपचारासाठी आलेल्या रुग्णांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी करुन व निर्णय घेऊन सिरसम बु.(ता.जि.हिंगोली) येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात गत १६ वर्षांपासून आरोग्य सहाय्यकासह इतर ६ कर्मचाऱ्यांची रिक्त असलेली पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन :** (१) हे अंशत: खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) ग्रामविकास विभागाच्या अखत्यारितील हिंगोली जि.प. सह सर्व जिल्हा परिषदेंतर्गत गट क मधील, आरोग्य व इतर विभागातील संवर्गाच्या पदभरतीचा कालबध्द कार्यक्रम विभागाच्या अनुक्रमे दिनांक २१ ऑक्टोबर, २०२२ व दिनांक १५ नोव्हेंबर, २०२२ च्या शासन निर्णयान्वये जाहीर करण्यात आला होता.तथापि, सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक २१ नोव्हेंबर, २०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये दिलेल्या निर्देशानुसार परीक्षा टी.सी.एस/आय.बी.पी.एस. या कंपन्यांद्वारे ऑनलाईन पध्दतीने घ्यावयाच्या आहेत. त्यानुसार जि.प. स्तरावर आय.बी.पी.एस. या कंपनीसोबत सामंजस्य करार (MOU) अंतिम करण्याची कार्यवाही सुरू आहे. तद्नंतर Application Portal विकसित करून लवकरच जिल्हा परिषद स्तरावर जाहिरात प्रसिध्द करण्यात येणार आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## रायगड, रत्नागिरी, सिंधुदूर्ग, पालघर या जिल्ह्यांच्या समुद्रकिनारी समुद्र कुटी संकल्पना राबविण्याबाबत

**(३३) * १७८८३ श्री.शशिकांत शिंदे, श्री.अमोल मिटकरी, श्री.सतिश चव्हाण, श्री.अनिकेत तटकरे :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रायगड हा पर्यटनदृष्ट्या महत्वपूर्ण जिल्हा असून पर्यटनाला चालना मिळावी यासाठी तत्कालीन शासनाने पर्यटन विभागाच्या माध्यमातून रायगड, रत्नागिरी, सिंधुदूर्ग, पालघर या जिल्ह्यात गोव्याच्या धर्तीवर समुद्र कुटी संकल्पना राबविण्याचा निर्णय घेतला असल्याची बाब माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वरसोली (ता.अलिबाग, जि.रायगड) व दिवेआगर (ता.श्रीवर्धन, जि.रायगड) येथील समुद्रकिनारी प्रकल्प तयार करण्यास शासनाने मंजूरी दिली असून, सदर प्रकल्प पूर्ण झाल्यास पर्यटनास चालना मिळून स्थानिकांना रोजगार उपलब्ध होणार आहे यामुळे वरसोली ग्रामपंचायत व दिवेआगर ग्रामपंचायतीने गावाच्या विकासाच्या दृष्टीने प्रकल्पाला सर्वतोपरी मदत करीत एमटीडीसीला जागा उपलब्ध करुन दिली असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकल्प कार्यान्वित करण्याकरिता सल्लागारांची नेमणूक करण्यात येऊनही अद्याप प्रकल्पास सुरुवात झाली नसल्याचे तसेच सदर समुद्र कुटी प्रकल्प हा समुद्रकिनारी होणार असल्याने सदर प्रकल्पास अद्याप पर्यावरण व वन विभागांची मंजुरीही प्राप्त झाली नसल्याचे दिनांक ५ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने या प्रकल्पामुळे पर्यटनाला चालना मिळून स्थानिक ग्रामस्थांना रोजगार उपलब्ध होण्याच्या दृष्टीने तसचे पर्यावरण व वन विभागांची सदर प्रकल्प पूर्णत्वास नेण्यासाठी परवानगी मिळण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.मंगलप्रभात लोढा :** (१) होय, हे खरे आहे.

शासन निर्णय दिनांक १७ ऑगस्ट, २०२० अन्वये राज्यातील समुद्रकिऱ्यावर सुनिश्चत ठिकाणांवर हंगामी स्वरुपात चौपाटी कुटी, आरामखुर्ची, छत्र्या आणि सार्वजनिक सुविधा केंद्र उभारण्यासाठी मान्यता देण्यात आली आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) व (४) बीच शॅक्स उभारणीच्या परवानगीकरिता महाराष्ट्र किनारपट्टी क्षेत्र व्यवस्थापन प्राधिकरण यांना प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## उन्हवरे (ता.दापोली, जि.रत्नागिरी) येथील गरम पाण्याच्या कुंडाची दुरवस्था झाल्याबाबत

**(३४)** * **१८२६८ श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उन्हवरे (ता.दापोली, जि.रत्नागिरी) येथील पर्यटन स्थळ असलेली गरम पाण्याची कुंड अस्वच्छ असून त्याची दुरवस्था झाली असल्याची बाब निदर्शनास आली असून, कुंडाला लागूनच बांधण्यात आलेल्या स्त्रीयांच्या स्नानगृहाच्या दरवाजाची मोडतोड झालेली असून, इतर स्वच्छतागृह सुध्दा नादुरूस्त असल्याने येथे येणाऱ्या पर्यटकांची गैरसोय होत असून पर्यटन व्यवस्थेवर याचा परिणाम होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उन्हवरे येथील गरम पाण्याच्या कुंडाची विनाविलंब दुरूस्ती करून पर्यटकांसाठी आवश्यक असलेल्या सोयी सुविधा उपलब्ध करून द्याव्यात अशा आशयाची मागणी येथील ग्रामस्थांनी मा.पालकमंत्री, रत्नागिरी जिल्हा, मा.पर्यटन मंत्री, जिल्हाधिकारी, रत्नागिरी व तहसिलदार, खेड आदींकडे गत ३ वर्षांपासून लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने उन्हवरे येथील गरम पाण्याचे कुंड बघण्यास येणाऱ्या पर्यटकांची कोणत्याही प्रकारे गैरसोय होऊ नये याकरिता सदर कुडांची स्वच्छता करुन तसेच नजिकच्या स्वच्छतागृहांची दुरुस्ती करुन पर्यटनाच्या विकासाच्या दृष्टीने मूलभूत सोयी सुविधा उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.मंगलप्रभात लोढा :** (१) नाही.

(२) अंशत: खरे आहे.

(३) उन्हवरे येथील गरम पाण्याचे कुंडाची संबंधित ग्रामपंचायतीमार्फत स्वच्छता करण्यात येते. सदर ठिकाणी सर्वसाधारण जिल्हा वार्षिक योजनेमधील 'क' वर्ग पर्यटन विकास योजना सन २०२०-२१ अंतर्गत रुपये १९.९८ लक्षचे शौचालय बांधणे हे काम पूर्ण करण्यात आले आहे. सन २०२१-२२ अंतर्गत उन्हवरे गरम पाण्याचे कुंड सुधारणे हे रुपये १४.९९ लक्षचे काम मंजूर असून याअंतर्गत स्नानगृह बांधणे हे काम समाविष्ट असून सदर काम सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## रत्नागिरी जिल्हा आरोग्य केंद्रातील आरोग्य सेविकांची रिक्त पदे भरण्याबाबत

**(३५) * १७२५४ श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.रमेशदादा पाटील :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्ह्यातील जिल्हा आरोग्य केंद्रातील आरोग्य सेविकांच्या पदासह ३४२ पदे रिक्त असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ३४२ पदांपैकी आरोग्यसेविकांची २२७ पदे रिक्त असून ग्रमीण भागात उपचार घेणाऱ्या नागरिकांना आरोग्यविषयक अनेक समस्यांना सामोरे जावे लागत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्रातील कार्यरत असणारे कर्मचारी यांच्यावर कामाचा अतिरिक्त ताण येत असून रत्नागिरी जिल्ह्यातील आरोग्य केंद्रातील आरोग्य सेवकांसह अनेक रिक्त पदांची भरती न केल्यामुळे याचा आरोग्य व्यवस्थेवर विपरित परिणाम होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले त्यानुषंगाने रत्नागिरी जिल्ह्यातील नागरिकांना सुसज्ज आरोग्य सेवा पुरविण्याकरिता जिल्हा आरोग्य केंद्रातील रिक्त पदे भरण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही अथवा उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.गिरीश महाजन :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) हे अंशत: खरे आहे.

जिल्हा परिषद रत्नागिरी अंतर्गत प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्रातील कामकाज नियमित तसेच बाह्य यंत्रणेद्वारे नियुक्त केलेल्या कर्मचाऱ्यांकडून तसेच अतिरिक्त कार्यभार देऊन करून घेतली जात आहेत. प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्राच्या कार्यक्षेत्रातील ग्रामीण जनतेला आरोग्य सेवा देऊन त्यांची गैरसोय होणार नाही याची दक्षता घेणेत येत आहे.

(४) ग्रामविकास विभागाच्या अखत्यारितील रत्नागिरी जि.प. सह सर्व जिल्हा परिषदेंतर्गत गट क मधील, आरोग्य व इतर विभागातील संवर्गाच्या पदभरतीचा कालबध्द कार्यक्रम विभागाच्या अनुक्रमे दिनांक २१ ऑक्टोबर, २०२२ व दिनांक १५ नोव्हेंबर, २०२२ च्या शासन निर्णयान्वये जाहीर करण्यात आला होता. तथापि, सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक २१ नोव्हेंबर, २०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये दिलेल्या निर्देशानुसार परीक्षा टी.सी.एस/आय.बी.पी.एस. या कंपन्यांद्वारे ऑनलाईन पध्दतीने घ्यावयाच्या आहेत. त्यानुसार जि.प. स्तरावर आय.बी.पी.एस. या कंपनीसोबत सामंजस्य करार (MOU) अंतिम करण्याची कार्यवाही सुरू आहे. तद्नंतर Application Portal विकसित करून लवकरच जिल्हा परिषद स्तरावर जाहिरात प्रसिध्द करण्यात येणार आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

----------------

## जळकेवाडी (ता.कर्जत, जि.अहमदनगर) येथील जागेवर जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेने केलेले अनधिकृत बांधकाम व अतिक्रमण काढण्याबाबत

**(३६) * १६९३० श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे जळकेवाडी (ता.कर्जत, जि.अहमदनगर) येथील गट नं.३८४ ही जागा श्री.प्रकाश गणपतराव शिंगाडे व इतर यांची असून, सदरहू जागेचा ७/१२ ही त्यांच्या नावे असून ही त्यांची वडिलोपार्जित ४ आर जमीन आहे. सदर गट नं.३८४ या जमिनीवर मौजे जळकेवाडी ता.कर्जत, जि.अहमदनगर येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेने अनधिकृत बांधकाम करून सदर जागेवर अतिक्रमण करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मौजे जळकेवाडी येथे जि.प.शाळेची इमारत बांधण्यासाठी श्री.काशिनाथ पुंडलिक राजापुरे यांनी गट नं.३८६ व ३८७ ही जागा बक्षिस पत्राद्वारे ४ आर जमीन देण्यात आली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर गट नं.३८६ व ३८७ वर अंगणवाडी शाळेच्या इमारतीचे बांधकाम करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) उप अधीक्षक, भूमी अभिलेख (ता.कर्जत, जि.अहमदनगर) यांनी दिनांक ११ नोव्हेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास श्री.शिंगाडे यांच्या मोजणी अर्जावरून मोजणी केली असता गट नं.३८४ मध्ये जि.प.प्राथमिक शाळा, जळकेवाडी यांनी अनधिकृत बांधकाम केल्याचे मोजणी अहवालात निष्पन्न झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उप अधीक्षक, भूमी अभिलेख (ता.कर्जत, जि.अहमदनगर) यांनी मोजणी केलेला अहवाल श्री.शिंगाडे यांनी गटशिक्षण अधिकारी, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, कर्जत यांचेकडे सादर केला असून यावर गटशिक्षण अधिकारी, गटविकास अधिकारी,पंचायत समिती, कर्जत यांच्याकडून गट नं.३८४ वर जिल्हा परिषद प्राथमिक शाळेने केलेल्या अनधिकृत बांधकाम व अतिक्रमण काढण्याबाबत अद्याप कोणतीही कारवाई न करण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(६) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन मौजे जळकेवाडी येथे गट नं.३८४ वर जिल्हा परिषद प्राथमिक शाळेने केलेल्या अनधिकृत बांधकाम व अतिक्रमण काढण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहेत, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) होय, हे खरे आहे.

(४) हे खरे नाही.

(५) व (६) अहमदनगर जिल्हा परिषद प्रशासनाने उपअधीक्षक, भुमीअभिलेख (ता.कर्जत) यांचेकडील गट नं. ३८४ मोजणी अहवाल मागविला असून तो अद्याप प्राप्त झालेला नाही.

-----------------

## हिंगोली येथील जिल्हा रुग्णालयातील प्रसूती विभागातील रिक्त पदे भरण्याबाबत

**(३७) * १७७६१ डॉ.प्रज्ञा सातव :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली जिल्हा रुग्णालयातील प्रसुती विभागामधील वर्ग-१ चे स्त्री-रोगतज्ञ व ३ वैद्यकीय अधिकाऱ्यांची पदे रिक्त असून ५ कंत्राटी डॉक्टरांवरच प्रसुती विभाग चालत असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रुग्णालयातील प्रसुती विभागात पाणी व स्वच्छतेचा अभाव असून परिणामी येथे उपचार घेत असलेल्या रुग्णांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी करुन हिंगोली जिल्हा रुग्णालयातील प्रसुती विभागामधील रिक्त पदे तातडीने भरण्यासह येथील पाणी, स्वच्छता इत्यादीच्या समस्या सोडविण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत

**डॉ. तानाजी सावंत :** (१) हे खरे नाही.

जिल्हा रुग्णालय, हिंगोली येथील प्रसुती विभागात स्त्री-रोगतज्ञ, वर्ग-१ चे ०१ पद मंजूर आहे. सदरील पद माहे जानेवारी, २०२३ मध्ये रिक्त झालेले असून ते सरळसेवा/पदोन्नतीने भरण्याची कार्यवाही सुरू आहे. तर स्त्री रोगतज्ञ, गट-अ, वर्ग-२ ची ०३ पदे मंजूर असून सर्व पदे भरलेली आहेत. त्याचबरोबर आय.पी.एच.एस. अंतर्गत स्त्री रोगतज्ञांची ५ कंत्राटी पदे मंजूर असून सर्व पदे भरलेली असल्याने कंत्राटी डॉक्टरांवर प्रसुती विभाग चालत आहे असे म्हणता येणार नाही.

(२) हे खरे नाही.

जिल्हा रुग्णालय, हिंगोली येथील प्रसूती विभागाची दैनंदिन नियमित स्वच्छता केली जात असून त्या ठिकाणी २४ तास मुबलक पाणीपुरवठा केला जातो.

(३) जिल्हा रुग्णालय, हिंगोली येथील प्रसूती विभागातील स्त्री-रोगतज्ञ, वर्ग-१ चे रिक्त झालेले पद आयोगाकडून शिफारस करण्यात आलेल्या उमेदवारांमधून अथवा पदोन्नतीद्वारे उपलब्ध होणाऱ्या उमेदवारांमधून भरण्यात येईल.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**राजेन्द्र भागवत**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.